RNI Regd. No. MAH/MAR/2001/10353 साईलीला दिनांक : १५ मे २०१४

श्री रामनवमी उत्सव २०१४


काकड आरती


संस्थानच्या त्रि–सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे यांच्या हस्ते गुरुस्थान येथे रुद्राभिषेक; सोबत पत्नीसह उपकार्यकारी अधिकारी आप्पासाहेब शिंदे...


माध्यान्ह आरती


शेजारती


धूपारती

समापन दिन


संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे व डॉ. सौ. शुभांगी शिंदे यांच्या हस्ते श्री साईबाबांची पाद्यपूजा...




समाधिमंदिरात दहीहंडी कार्यक्रम...

प्रकाशक व मुद्रक कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) करिता मे. टॅको व्हिजन्स प्रा. लि., ३८ ए व बी, गव्हर्नमेंट इंडस्ट्रियल इस्टेट, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई – ४०० ०६७ येथे छापून साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे प्रकाशित केले. संपादक : कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे अधिकृत नियतकालिक
मे – जून २०१४ ₹ ८/–

# साईलीला



**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

**व्यवस्थापन समिती**

मा. श्री. शशिकांत कुलकर्णी (प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर)
अध्यक्ष

मा. श्री. अनिल कवडे
(जिल्हाधिकारी, अहमदनगर)
सदस्य

मा. श्री. कुंदनकुमार सोनवणे
(उपविभागीय अधिकारी, शिर्डी, अहमदनगर) कार्यकारी अधिकारी तथा
सदस्य

मा. श्री. आप्पासाहेब शिंदे उपकार्यकारी अधिकारी


# साईलीला


स्थापित वर्ष १९२३ * वर्ष १४ * अंक ३

संपादक : कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)


## अंतरंग


- स्मरणीय — २
- श्री साईंच्या सान्निध्यात – काका महाजनी : सौ. मुग्धा सुधीर दिवाडकर — ३
- ''साईकृपेने माझ्या जीवनात लक्षणीय परिवर्तन'' : जयंत दत्तात्रय कुलकर्णी — ७
- ।। अभंग श्री साईसच्चरित ।। अ. ५१ : सतीश काळे — १२
- साईअनुभव — २१
- नित्य घ्या प्रचीत अनुभवें। : सौ. शर्मिला पटवर्धन — २५
- *धन्वंतरी साई* : सौ. मयूरी महेश कदम — २७
- शिर्डीवृत्त — २९



इंटरनेट आवृत्ती – URL:http://www.shrisaibabasansthan.org

● आवरण व अन्य पृष्ठे सजावट : व्ही. कार्तिक, प्रकाश सामंत व टॅको व्हिजन्स प्रा. लि. ● संगणकीय अक्षरजुळणी : संगणकीय विभाग, मुंबई कार्यालय, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) ● कार्यालय : 'साईनिकेतन', ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४. दूरध्वनी : २४१६६५५६ फॅक्स : (०२२) २४१५०७९८ ई–मेल : saidadar@sai.org.in ● शिर्डी कार्यालय : मु. पो. : शिर्डी – ४२३ १०९, ता. : राहाता, जि. : अहमदनगर. दूरध्वनी : (०२४२३) २५८५०० फॅक्स : (०२४२३) २५८७७० ई–मेल : 1. saibaba@shrisaibabasansthan.org 2. saibaba@sai.org.in ● टपालखर्चासहित वार्षिक वर्गणी : ₹ ५०/– ● आजीव सभासद वर्गणी : ₹ १०००/– ● परदेशाकरिता वार्षिक वर्गणी : ₹ १०००/– ● सर्वसाधारण अंकाचे मूल्य : ₹ ८/– ● श्री साईपुण्यतिथी विशेषांकाचे मूल्य : ₹ १५/– ● प्रकाशक व मुद्रक कार्यकारी अधिकारी यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) करिता हे द्वैमासिक टॅको व्हिजन्स प्रा. लि., ३८ ए व बी, गव्हर्नमेंट इंडस्ट्रियल इस्टेट, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई – ४०० ०६७ येथे छापून 'साईनिकेतन', ८०४–बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४ येथे प्रकाशित केले. या नियतकालिकातील लेखांत प्रसिद्ध झालेली मते ही त्या लेखांतील लेखकांची स्वतंत्र मते असून, त्या मतांशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्वप्रकारच्या हरकती, वादविवाद, मतभेद, हक्क, कायदेशीर कार्यवाही आदी बाबी मुंबई परिक्षेत्रातच उपस्थित करता येतील.

स्म
र
णी
य

दुसऱ्यांचे दुःख, मग ते कोणत्याही स्वरूपाचे असो, ते दूर करून माणसाला सुखी करणे, हा कृपासिंधू साईबाबांचा एक धर्म होता. रुग्णाईताच्या सेवेला व त्याच्या दुःखविमोचनाला बाबा अग्रपूजेचा मान देत असत. त्यांच्यासाठी परोपरीने झटत असत. स्वतःच्या आचरणाने रुग्णसेवेचा उच्च आदर्श बाबांनी सर्वांपुढे ठेवला आहे. रुग्णांची, दुःखपीडितांची व रंजल्या-गांजलेल्यांची सेवा म्हणजे खरीखुरी देवपूजा, अशा प्रकारचा पूजेचा सर्वोच्च आदर्श त्यांनी जगापुढे ठेवला आहे.

आम्हाला साईबाबांना प्रसन्न करून घ्यायचे आहे, साईबाबांची कृपादृष्टी आमच्याकडे वळवून घ्यायची आहे; ती कोणत्या मार्गाने गेले असता वळेल? उत्तर अगदी सुस्पष्ट आहे. त्यांना ज्या गोष्टी आवडत असत, त्यांनी आपल्यापुढे रुग्णसेवेच्या रूपाने जो मार्ग ठेवला, त्या मार्गाने गेले असता बाबांची कृपा संपादन करता येईल, हे उघड आहे.

शिर्डीत बाबांचे वास्तव्य घडले, त्यांच्या वास्तव्याने तो गाव व आसपासचा परिसर पुण्यपावन झाला. तेथील रोगराईच्या दुःखाचे प्रमाण न्यून असावे, त्यावर जरूर ती उपाययोजना व्हावी व बाबांचे जे उच्च उद्दिष्ट होते ते साध्य व्हावे, या हेतूने सुमारे दोन वर्षांपूर्वी शिर्डी येथे हॉस्पिटलचा कोनशिला समारंभ त्यावेळचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाला.

मे महिन्याच्या १४ तारखेस गुरुवारी या हॉस्पिटलचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री ना. श्री. शेषराव वानखेडे यांच्या हस्ते मोठ्या थाटात पार पडला.

या हॉस्पिटलसाठी आतापर्यंत एकंदर खर्च सुमारे चार-साडेचार लक्ष रुपयांपर्यंत झाला असावा. अजूनही ८/१० लक्ष रुपये, हॉस्पिटल सर्व प्रकारे सुसज्ज व अद्ययावत करण्यासाठी खर्च करावे लागतील. ज्यांनी हे कार्य आतापर्यंत यशस्वी रीतीने पार पाडविले ते बाबाच त्याची पूर्णता घडवून आणतील हे निश्चित होय!

शिर्डी येथील श्री साईनाथ हॉस्पिटल थोड्याच कालावधीत नावारूपास येईल. ज्या उद्देशाने त्याची स्थापना करण्यात आली तो उद्देश उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात सफल होत असल्याचे दिसून येईल अशी अपेक्षा करण्यास भरपूर वाव आहे. या हॉस्पिटलच्या निर्मितीला जशी बाबांची प्रेरणा कारणीभूत झाली त्याचप्रमाणे बाबांच्या अनेक भक्तांचा सक्रिय सहकार या लोकोपयोगी कार्याला लाभलेला आहे.

सध्या या हॉस्पिटलमध्ये वीस ते चौवीस खाटांची सोय करण्यात आलेली असली, तरी यापुढील काळात त्यांची वाढ होऊ शकेल अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्री साईनाथ हॉस्पिटल या संस्थेचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. शिर्डीतील ही लोकोपयोगी संस्था अहमदनगर जिल्ह्यातच नव्हे, तर अखिल महाराष्ट्रात उत्तम प्रकारचा नावलौकिक संपादन करील, अशी आम्हाला खात्री वाटते. श्री साईनाथांच्या कृपेने ही इच्छा सफल होवो, हीच आमची प्रार्थना आहे.

**संपादक**

**– श्री साईलीला (शिर्डी संस्थानचे अधिकृत मासिक), जून १९६४, वर्ष ४३वे, अंक ४था**

❍ ❍ ❍

विद्यमान १२० खाटा असलेल्या श्री साईनाथ हॉस्पिटलच्या पन्नास वर्षांच्या कारकीर्दीत रुग्णांकरिता पुढील विभागांद्वारे विविध रोगांवरील उपचार उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत :-

तातडीची सेवा (क्यॅजुल्टी), ई.एन.टी., डेंटल, होमिओपॅथिक, जनरल फिजिशियन, ऑर्थोपेडिक, आयुर्वेदिक, स्त्री-रोग, नेत्ररोग, बालरोग, त्वचारोग, ब्लडबँक, सोनोग्राफी, एक्स-रे, हिस्टोपॅथॉलॉजी लॅब, पॅथॉलॉजी लॅब, ई.सी.जी., फिजिओथेरेपी, जनरल ऑपरेशन थिएटर, ई.एन.टी. ऑपरेशन थिएटर, अतिदक्षता, मेल मेडिकल वॉर्ड, फिमेल मेडिकल वॉर्ड, मेल सर्जिकल वॉर्ड, फिमेल सर्जिकल वॉर्ड, गायनिक सर्जिकल वॉर्ड, ऑर्थोपेडिक वॉर्ड, ई.एन.टी. वॉर्ड, गायनिक वॉर्ड, बालरुग्ण मेडिकल वॉर्ड, औषधे-वाटप, प्रथमोपचार केंद्र (समाधिमंदिरपरिसर)... याचबरोबर मोफत नेत्रतपासणी, चष्मेवाटप, मोतिबिंदू शस्त्रक्रिया, जयपूर फूट आदी शिबिरे वेळोवेळी आयोजित केली जातात. आर्थिक दुर्बल घटकातील हृदयशस्त्रक्रिया, मूत्रपिंडप्रत्यारोपण, ब्रेनट्युमरवरील शस्त्रक्रिया आदी खर्चिक उपचारांसाठी समाजातील आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना आर्थिक वैद्यकीय मदत दिली जाते.

**बुधवार, दिनांक १४ मे, २०१४**



# काका महाजनी




श्री साईसच्चरित वाचणाऱ्या साईभक्तांसाठी ‘काकासाहेब महाजनी’ हे नाव काही नवीन नाही. त्यांच्यासंदर्भात पोथीत आलेले अनेक अनुभव आपल्याला माहीत आहेत; किंबहुना व्यक्तिगत दृष्टिकोनातून पाहिलं, तर त्यांच्यासंदर्भातले अनुभव पोथीत सर्वाधिक आहेत, असं म्हटल्यास वावगं ठरू नये.

## लोकप्रिय व्यक्तिमत्त्व

लक्ष्मण गणेश महाजनी हे जनमानसात ‘काकासाहेब महाजनी’ म्हणून प्रसिद्ध होते. सच्चिदानंद सद्गुरु साईबाबांचे ते लाडके ‘बडेकाका’ होते. महाजनींचा शुद्ध भक्तिभाव पाहूनच या सत्त्वस्थ भक्ताला बाबांनी ही सुंदर पदवी बहाल केली होती.

महाजनींचा जन्म १८७४च्या सुमारास झाला. त्यांच्या पत्नी या भडभडे घराण्यातल्या. त्या ‘काकूबाई’ किंवा ‘आई’ या नावाने परिचित होत्या. अतिशय नाजूक, लहानखुऱ्या, उंचीने अगदी बेताच्याच असं त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं.

काकासाहेब महाजनींना आकर्षक देखणं रूप आणि सुदृढ शरीरयष्टी याची निसर्गदत्त देणगी होती! एक थोर, उमदं आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची चहूकडे ख्याती होती. त्यांचा स्वभाव गप्पीष्ट होता. बोलण्याची आवड आणि गोष्टी सांगण्याची हातोटी यामुळे अनेक माणसं त्यांनी आपल्याभोवती गोळा केली होती. पुढे याच ओळखींतून मुंबईला राहणारे कित्येकजण श्री साईबाबांकडे ओढले गेले.

दादासाहेब खापर्डेंप्रमाणेच त्यांना गाण्याचा आणि नाटकांचा खूप शौक होता. गाण्यांच्या मैफिली आणि बालगंधर्वांची नाटकं ते कधीही चुकवत नसत. देखणं रूप, गोड गळा, याबरोबरच त्यांना आणखी एका कलेची अत्यंत आवड होती, ती म्हणजे छायाचित्रणाची (फोटोग्राफीची)! मुळात कलाकार असलेल्या महाजनींनी एकेकाळी तो व्यवसाय म्हणूनही स्वीकारला होता.

ते कर्तृत्ववान होते, सदाचरणी होते, स्वधर्माचरणी होते. त्यांना लौकिक प्रतिष्ठा भरपूर लाभली. अध्यात्मातही त्यांचा अधिकार चांगला होता. बाबांकडे येण्याअगोदरपासून त्यांची पूजा-अर्चा, भजन-पूजन, पोथीवाचन नियमित चालत असे. आपल्या गोड आवाजात एकतारीवर भजनं म्हणण्यात त्यांना आनंद मिळे.

सुरुवातीला त्यांचं वास्तव्य पुण्यात होतं. पुढे ते मुंबईस आले. बरीच वर्षं त्यांनी धरमसी सॉलिसिटर यांच्या पेढीवर काम केलं. (श्री साईसच्चरिताच्या अ. ३५ मध्ये या धरमसी जेठाभाई ठक्कर यांची गोष्ट आलेली आहे.) त्यानंतरची काही वर्षं त्यांनी सूरजी वल्लभदास आणि कंपनीमध्ये भागीदारीत काम केलं. या कंपनीत रंगांचा व्यापार चालत असे. कंपनीतर्फे १९२१ ते १९२४ मध्ये ते इंग्लंडलाही जाऊन आले होते.

त्यांना कायद्याचं उत्तम ज्ञान होतं. अनेक विषयांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांचा सल्ला घेण्यासाठी लोक मुद्दामहून त्यांच्याकडे येत. चेंबर ऑफ कॉमर्सचे ते मेंबर होते. पुढे तिथे प्रेसिडेंट म्हणून त्यांनी काम पाहिलं.

एकूणच लाडकं लोकप्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वजण त्यांच्याकडे पाहत.


## साईबाबांचं प्रथम दर्शन आणि सेवा

नंतर मुंबईला राहण्यास आल्यावर काकासाहेब दीक्षितांकडून त्यांना प्रथम बाबांचं नाव कळलं. पुढे दीक्षितांबरोबरच दासगणूमहाराज, नानासाहेब चांदोरकर, प्रधान, पाखाडे, तर्खड अशा एकापेक्षा एक भक्तमंडळींच्या सहवासात महाजनींना बाबांविषयी खूपकाही कळत गेलं. सद्गुरुविषयी आकर्षण निर्माण झालं. त्यांच्या दर्शनाची ओढ वाटू लागली. ती ओढ अधिकाधिक तीव्र होऊ लागली.

... आणि १९१०च्या सुमारास महाजनी शिर्डीला पोहोचले. बाबांना पाहिलं मात्र, आणि ते कायमचे त्यांचेच होऊन गेले. त्यांना बाबांचं पहिलं दर्शन कसं घडलं, याविषयीची अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. एवढं मात्र नक्की की, प्रथम दर्शनानंतर दिवसातून कमीत-कमी दोन वेळा आपल्या गोड आवाजात एकतारीवर बाबांच्या तसबिरीसमोर बसून ते भजनरंगात रंगून जाऊ लागले. दर गुरुवारी बाबांना हार व शिऱ्याचा प्रसाद दाखवण्याचा त्यांचा प्रघात होता. स्वतः उत्तम आवाजात भजन-कीर्तन करताना ते देहभान हरपून गात. त्यांची कीर्तनाची शैली रसाळ होती. श्रोते ऐकता ऐकता मंत्रमुग्ध होत.

## असा झाला शिर्डीतला पहिला रामजन्मोत्सव!

पुत्रसंतती झाली या आनंदाप्रीत्यर्थ गोपाळराव गुंडांनी



उरूस भरवण्याचं ठरवलं आणि त्याप्रमाणे तो शिर्डीत दर रामनवमीला भरू लागला. मात्र, रामजन्मोत्सवाची सुंदर कल्पना सुचली ती कृष्ण जागेश्वर भीष्म यांना!

काय झालं, एकदा महाजनी नेहमीप्रमाणे लगबगीने बाबांच्या पूजेसाठी ताट आणि धोतर सावरत निघाले होते. शिर्डीत त्यांचा मुक्काम बरेचदा दीक्षितवाड्यात असायचा. तिथल्या पडवीत भीष्मांची नेहमीची बसण्याची जागा होती. महाजनींना बघून भीष्मांनी त्यांना हाक मारली आणि आपला रामजन्मोत्सव साजरा करण्याचा मनोदय कथन केला. कल्पना तर मन मोहून टाकणारीच होती. पण, ती यशस्वी करण्यासाठी बाबांच्या परवानगीची आवश्यकता भासणार! त्याबाबतीत बाबांना विचारल्यावर त्यांनी तात्काळ होकार दिला.

महाजनींचा गायन-पेटीवादन यात हातखंडा. भीष्मांनी कीर्तन करायचं आणि महाजनींनी हार्मोनियमवर बसायचं असं ठरलं. मात्र, दुसऱ्या दिवशी जन्मोत्सवाला सुरुवात होणार, तर बाबांची वृत्ती अचानकपणे खवळली. ते लेंडीहून आले तेच क्रोधावतार धारण करून! जागेवर बसून त्यांनी काकासाहेबांना वर बोलावणं पाठवलं.

महाजनी स्वभावाने अगदी मवाळ. बाबांसमोर बोलण्याचं धाडस करणाऱ्यांपैकी ते नव्हते. उलट,

'बाबांचा निरोप घेऊन गेल्यावर पुन्हा शिर्डीत परत येईपर्यंत आपल्या हातून ज्या चुका घडल्या असतील त्याविषयी तर बाबा बोलणार नाहीत,' ही भीती त्यांच्या मनात सदैव असायची. बरोबर आहे, विशुद्ध भावनेने आणि निर्मळ मनाने जो ईश्वराकडे जातो त्याला एखाद्या क्षुल्लक चुकीमुळेदेखील अपराधी वा दोषी वाटणार, हे सांगायला नको. एखादी मुंगी जरी मारली गेली तरी त्याचा दोष तो आपल्याकडेच घेणार.

झालं. बाबांनी बोलावणं पाठवल्यावर ते थरथरत आणि भीत-भीत मागे वळून पाहत मशिदीच्या पायऱ्या चढू लागले. पण, बाबांचा इरादा वेगळाच होता. त्यांनी मोठ्या प्रेमाने निंबरावरचा आपल्या गळ्यातला एक हार काढून स्वहस्ते महाजनींच्या गळ्यात घातला. त्यांना पाळणा बांधायचं प्रयोजन विचारलं, आशीर्वाद दिला आणि दुसरा हार त्यांच्याकरवी भीष्मांसाठी पाठवून दिला.

अशा रीतीने बाबांनी १९११ (श्रीसाईसच्चरित)/१९१२ (काकासाहेब महाजनी) पासून शिर्डीतल्या पहिल्या रामजन्मोत्सवाची जबाबदारी महाजनी आणि भीष्म यांच्यावर सोपवली.

पुढे जन्मोत्सव झाल्यावर गुलाल उधळला गेला आणि तो नेमका बाबांच्या डोळ्यांत उडाला आणि बाबांनी नरसिंहावतार धारण केला. शिव्यांची लाखोली वाहिली. हा सारा प्रकार पाहून राधाकृष्णाआईंनी आपल्या दैवताचा पाळणा काढून घेण्यासाठी महाजनींकडे लकडा लावला. कारण, त्यांनीच तो आईंकडून मागून आणला होता ना! पाळणा काढायला जाताच बाबांनी महाजनींचा हात धरला आणि चिडून म्हणाले, ''कशाला काढतूस रं! अजून त्याची गरज हाय आपल्याला!''

मग दुसऱ्या दिवशी गोपाळकाला झाल्यावर बाबांनी



अखेर पाळणा सोडण्यास परवानगी दिली.

## बाबांचा अनुग्रह

आता पहा, बाबांनी महाजनींवर कसा अनुग्रह केला; त्यांनी आपल्या गळ्यात घातलेला हार स्वहस्ते महाजनींच्या गळ्यात घातला आणि रामजन्मोत्सवाचा 'श्री गणेशा' केला. परमेश्वरी स्पर्शाची जादू महाजनींनी अशी अकल्पितपणे अनुभवली. हा अद्भुत स्पर्श अनुभवायला मिळणं आणि परमेश्वराने स्वहस्ते तो प्रसाद देणं, यापरीस भाग्य ते कोणतं?

हे कां झालं? महाजनींची भक्तीच तशी अनन्य होती, निष्काम होती; ती मनात कोणतीही इच्छा, वासना ठेवून केलेली नव्हती. मन आणि बुद्धी एक होणं आणि ती ईश्वरचरणी अर्पण होणं महत्त्वाचं. नाही तर आपलं काय होतं, मन सदैव भरकटत असतं आणि बुद्धीचाही निश्चय कधी होत नाही. बुद्धीच्या ताब्यात मन राहण्याऐवजी मनाच्या ताब्यात बुद्धी जाते आणि मग सगळाच घोळ होऊन बसतो.

ईश्वरचरणी एकरूपता हवी. मनात, बुद्धीत आपल्या सद्गुरुचं अखंड चिंतन हवं. त्याचा ध्यास हवा. सातत्य हवं. नामानुसंधान हवं. नामाने आपला रोम-रोम बहरून यायला हवा. सद्गुरु आपल्याकडे त्याच्या अनिमिष नेत्रांनी सतत पाहतो आहे, तेव्हा आपल्या ज्ञानेंद्रियांकडून आणि कर्मेंद्रियांकडून क्षुल्लक चूकदेखील होता कामा नये यासाठी क्षणाक्षणाला जागरूक राहायला हवं. आपले प्रयत्न आणि ईश्वराची कृपा यामुळेच अखेर ब्रह्मदर्शन होतं ना!

## ''बंद झाली जा तुझी मोडशी''

१९१२ साली मशिदीच्या सभामंडपाच्या फरशीचं काम नुकतंच सुरू झालं होतं. त्यावेळी महाजनी जुलाबाच्या विकाराने आठवडाभर हैराण होते. बाबांची सेवा आणि आरती चुकू नये म्हणून त्या परिस्थितीतही त्यांनी काय केलं, मशिदीच्या बाहेरच्या बाजूला कोपऱ्यात अंधारातही हाताला लागेल असा एक टमरेल ठेवून दिला. वेळ पडेल तेव्हा-तेव्हा जाऊन निर्मळ होऊन परतायचं हा हेतू.

त्या दिवशी फरशीच्या कामाला सुरुवात झाली आणि बाबा लेंडीवरून परतले. तोडफोडीचा आवाज ऐकून बाबांनी आरडाओरड सुरू केली. मशिदीत आजूबाजूला बसलेली

भक्तमंडळी भराभर पांगली. महाजनीही घाबरले. पण, बाबांनी त्यांचा हात घट्ट धरून ठेवला. म्हणाले,''कुटं जातोस रं, बैस खाली!''

बाजूला पडलेली कोणाची तरी शेंगदाण्याची पिशवी बाबांनी जवळ ओढली आणि ते दाणे साफ करून महाजनींना देऊ लागले. हे करताना शिव्याशापांचा दणकाही सुरू होताच. दाणे संपल्यावर त्यांनी महाजनींना पाणी आणायला सांगितलं. प्रथम ते स्वतः प्यायले आणि तेच पाणी त्यांनाही पाजलं. म्हणाले, ''बंद झाली जा तुझी मोडशी. आता जा बाकीच्यांना परत बोलावून घे.''... त्या क्षणापासून महाजनींना बरं वाटायला लागलं हे सांगणं नकोच.

बाबांनी या एका घटनेतून किती वेळा महाजनींना आपल्या प्रेमाची ग्वाही दिली पहा... स्वतः त्यांचा हात पकडणं, त्यांना आपल्या हाताने शेंगदाणे - अगदी साफ करून - खाऊ घालणं, आपण प्यायलेलं पाणी त्यांना पाजणं आणि 'तुझी मोडशी आता बंद झाली' म्हणून आश्वासन देणं, हे सद्गुरुच्या आपल्या भक्तावरच्या अद्वितीय प्रेमाचंच दर्शन नाही का ?

## 'सद्गुरु इकडे आहे, तिकडे नाही असं असतं कां ?'

एका रामनवमीला महाजनी दरवर्षीप्रमाणे शिर्डीतच होते. संध्याकाळी भक्तमंडळींनी मशीद गच्च भरली होती. महाजनी बाबांचं पादसंवाहन करीत बसले होते. बोलता-बोलता बाबा म्हणाले, ''घराला दुपारी कुलूप होतं ना!'' महाजनी चमकले. त्यांच्या लक्षात आलं की, हे सर्व बोलणं आपल्याला उद्देशून आहे आणि दुपारी म्हणाल तर, सर्व मंडळी रामनवमीच्या निमित्ताने प्रसादासाठी मंदिरात गेली असणार!

तेवढ्यात बाबा म्हणाले, ''इंदूर लई लांब बरं का. पाय लई दुखले!'' हे ऐकून तर महाजनींच्या डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहू लागला. आपल्यासारख्या क्षुल्लक भक्तांसाठी सद्गुरुला स्वत:चा देह कसा शिणवावा लागतो, या कल्पनेने ते अतिशय बेचैन झाले. लाख वेळा त्यासाठी त्यांनी बाबांची क्षमा मागितली असेल. पण, बाबांचं आपलं एकच, ''अरं, तुमची काळजी मी न्हाई करणार तर कोण? मी सर्वत्र आहे बरं!''

सद्गुरूंचा संचार सर्वत्र कसा असतो, याचं हे मूर्तिमंत उदाहरण! असेच काही अनुभव बाबांच्या इतर भक्तांनाही आले होते.

- श्री साईसच्चरिताच्या ९व्या अध्यायात आलेली तर्खडांची गोष्ट आठवते ना? बाबा म्हणाले होते, ''आज मी वांद्र्याला गेलो होतो बरं का; खिडकी बंद हुती. तसाच आत शिरलो; पण खायाला-पियाला काही बी मिळालं न्हाई. म्हणून मला तसंच उपाशी परत यावं लागलं. भुकेने जीव लई कळवळला माझा!''

- दादासाहेब खापर्डे आणि त्यांचे चिरंजीव बळवंतराव शिर्डीत असताना बाबा एकदा बळवंतरावांना म्हणाले होते, ''आज मी तुझ्या एलिचपूरच्या घरी गेलो होतो. तू मला पोटभर जेवू घातलंस; पण दक्षिणा न्हाई दिलीस!''

- बाबांचे एक निस्सीम भक्त शांताराम बळवंत नाचणेंच्या बाबतीतही असाच प्रसंग घडला होता. एका साधूच्या रूपात बाबा त्यांच्याकडे डहाणूला घरी येऊन जेऊन आशीर्वाद देऊन गेले. त्यानंतर काही काळाने म्हणजे जवळ-जवळ २।।/३ वर्षांनी नाचणे जेव्हा बाबांकडे प्रथम आले तेव्हा बाबा उद्गारले, ''त्या दिवशी मी तुझ्याकडं भरपूर जेवलो बरं का; पन मला भेंड्याची भाजी न्हाई दिली.'' हे खरंच होतं. भेंड्याच्या भाजीसारखं मामुली तोंडी लावणं एका सत्पुरुषाला कसं वाढायचं म्हणून त्यांच्या भावजयीने ती भाजी त्यांना वाढली नव्हती.

अशा कितीतरी गोष्टी! सद्गुरु हा त्रिकालज्ञानी असतो. भूत-भविष्य-वर्तमान तो सर्व जाणतो. त्याचा संचार सर्वत्र असतो, हे सांगताना समर्थ रामदासांच्या एका अप्रतिम ओवीची इथे आठवण होते. सद्गुरुतत्वाचं वर्णन करताना ते म्हणतात :

**धरु जातां धरिता न ये।**
**टाकू जाता टाकिता न ये।**
**जेथे तेथे आहेच आहे। परब्रह्म ते।।**

सद्गुरु इकडे आहे, तिकडे नाही असं असतं कां? आज-काल अशी आवई सर्रास उठलेली पाहायला मिळते की, साईबाबा आता शिर्डीत नाहीत. एक विचार करा, सद्गुरु ही मुळात व्यक्ती नाही; ती शक्ती आहे देहरूपाने या पृथ्वीतलावर अवतरित झालेली. ते तत्व आहे. ते अज-अमर आहे. ते सर्वत्र सर्वज्ञ आहे. त्याची सुरुवात नाही, तसा त्याचा शेवटही नाही.

(पृष्ठ क्र. २४वर)

# "साईकृपेने माझ्या जीवनात लक्षणीय परिवर्तन"

**माजी अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**

३० मार्च २०१२ हा माझ्या जीवनातील सर्वांत अतिभाग्याचा दिवस.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या विश्वविख्यात धर्मादाय संस्थेचा मी अध्यक्ष होईन, असे मला स्वप्नातही वाटले नव्हते.

जानेवारी २०११ मध्ये माझी अहमदनगर जिल्ह्याचे प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्याने दिनांक २४ जानेवारीला, त्या पदाचा कार्यभार स्वीकार करण्यासाठी मी दिनांक २२ जानेवारीला पुण्याहून अहमदनगरला आलो. बाबांचे आशीर्वाद घेऊनच पदभार स्वीकारावा, या हेतूने मी २२ जानेवारी रोजी रात्री शिर्डीत शेजारतीला उपस्थित राहिलो. त्यावेळी बाबांची क्षमा मागून, नेहमी नेहमी येणे शक्य होणार नसल्याचे त्यांना सांगितले. तेव्हा भविष्यात बाबांची सेवा करावी लागणार आहे आणि वारंवार शिर्डीला यावे लागेल, अशी पुसटशीही कल्पना माझ्या मनात आली नाही.

सुरुवातीच्या एक वर्षाच्या काळात अनेकदा माझे राहाता, कोपरगाव येथे कोर्ट-इन्स्पेक्शनच्या व इतर प्रशासकीय कामाच्या निमित्ताने जाणे होई, शिर्डीलाही जावे लागे; पण त्यावेळी कामाच्या व्यस्ततेमुळे बाबांचे दर्शन घेऊ शकलो नाही. त्या काळात एकदा बॉम्बे हाईकोर्टाचे मुख्य न्यायाधीश श्री साईबाबांच्या दर्शनार्थ आले होते. त्यावेळी मला शिर्डीस जावे लागले होते. भक्तांची गर्दी लक्षात घेऊन रांगेतून दर्शन घेणे मला शक्य होणार नाही, असे वाटून मी दर्शन टाळले.

२००८ मध्ये प्रथम आई व त्यानंतर २०१० मध्ये वडिलांच्या मृत्यूमुळे माझ्या जीवनात एकदम पोकळी निर्माण झाल्याचे मला वाटू लागले. कालांतराने अहमदनगरला आल्यावर नागोठाण येथील भाऊ कुलकर्णी ऊर्फ गुरुजी या संतासमान सद्गृहस्थांशी भेट झाली आणि माझ्या जीवनात निर्माण झालेली पोकळी भरून आली. माझ्या मुलींना त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटू लागला आणि गुरुजींनीही त्यांना आजोबांची माया दिली.

शिर्डी संस्थानच्या अध्यक्षपदाचा कार्यभार सांभाळण्यापूर्वी जवळपास ६ महिनेअगोदर गुरुजींनी माझा कुठल्यातरी देवस्थानशी संबंध येईल, असे भाकित वर्तविले. हे पद सहजासहजी मिळणार नाही, असेही त्यांनी सांगितले. त्यांनी जे काही सांगितले ते घडून आले. कारण, प्रथम शिर्डी संस्थानच्या त्रि-सदस्यीय समितीचे सदस्य म्हणून जिल्हा न्यायाधीश, कोपरगाव यांचे नाव पुढे आले, वर्तमानपत्रातही तसे प्रसिद्ध झाले. परंतु, माननीय उच्च न्यायालयाने प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांना शिर्डी संस्थानचे अध्यक्ष म्हणून नियुक्त केले. हे सर्व साईबाबांच्याच आशीर्वादामुळे घडले याची मला ठाम खात्री आहे.

त्रि-सदस्यीय समितीच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यावर माझे अवघे जीवनच बदलून गेले. समितीचा अध्यक्ष झाल्यावर माझ्यात बरेच स्थित्यंतर घडून येत असल्याचे मला जाणवू लागले. पूर्वी मी बाबांच्या समाधीचे दर्शन काही-ना-काही स्वार्थ हेतू साध्य होण्यासाठी घेत असे. मात्र, अध्यक्षपदाची जबाबदारी आल्यावर तो स्वार्थ पुरता निघून गेला. त्यानंतर स्वत:करिता अथवा कुटुंबाकरिता बाबांकडे काही याचना करावी, असे कधीच वाटले नाही. मनात सतत भक्तांचा व त्यांच्यासाठीच्या सोई-सुविधांचाच विचार असायचा. सर्व भक्तांना, विशेषत: वयस्कर व विकलांग भक्तांना दर्शन कसे विनाअडथळ्याशिवाय सुरक्षिततेत, शांततेत, समाधानकारकरीत्या घेता येईल, याचाच विचार माझ्या मनात असायचा. याच विचारात समाधिस्थान सोडले जायचे आणि मग लक्षात यायचे की बाबांचा आशीर्वाद घ्यायचा राहिला.

अध्यक्ष या नात्याने माझ्याकडे बरेच फोन कॉल्स, अर्ज/तक्रारी येत असत. त्यावर मी सकारात्मक दृष्टीने माहिती घेत असे. विनासायास मोकळेपणाने भक्तांना दर्शन कसे होईल, या सततच्या विचाराने मी झोप घेऊ शकत नव्हतो; त्याचा त्रास मात्र मला झाला नाही. साईविचाराने माझे जीवन कसे भारले गेले ते कळलेच नाही.

१५ तालुके, ८० ते ८३ न्यायाधीश, जवळपास ९७५ कर्मचारी असलेल्या अहमदनगरसारख्या महाराष्ट्रातील बऱ्याच मोठ्या जिल्ह्याचे न्यायविषयक प्रशासन सांभाळून शिर्डी संस्थानचे कामकाज सांभाळणे हे काही साधे काम नव्हते. परंतु, त्रि-सदस्यीय समितीचे सदस्य श्री. संजीवकुमार, जिल्हाधिकारी (अहमदनगर), श्री. किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी व डॉ. यशवंत माने, उपकार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी यांची अगदी मनापासून मला साथ मिळून त्यांच्या अथक परिश्रमांमुळेच त्रि-सदस्यीय समितीला प्रशासनाचा गाडा व्यवस्थितपणे हाकता आला.

श्री साईबाबांच्या आशीर्वादामुळेच संस्थानची विविधांगी कार्ये मी यशस्वीपणे पार पाडू शकलो. सकाळी व वेळ मिळेल तेव्हा मी दूरदर्शनच्या माध्यमातून श्री साईबाबांचे थेट दर्शन घेत असे. त्या दरम्यान मंदिरपुजारी समाधीजवळ उभे असल्याचे व समाधी ओलांडत असल्याचे दिसून आले. त्यामुळे रांगेतील लांबच्या भक्तांना बाबांचे दर्शन करणे कठीण होत असल्याचे माझ्या लक्षात आले. लागलीच मी पुजाऱ्यांनी समाधीजवळ उभे राहू नये, समाधी ओलांडू नये म्हणून सूचना दिल्या. भक्तांशी, विशेषत: स्त्री, वयोवृद्ध, दुर्बल अशा भक्तांशी कर्मचाऱ्यांनी सौजन्याने वागावे, समाधिस्थानी मागच्या गेटने कोणासही प्रवेश करू देऊ नये म्हणूनही सूचना देण्यात आल्या.

भक्तांना प्रथम दर्शनाकरिता रांग लावल्यावर पुन्हा प्रसादलाडूखरेदी करण्याकरिता रांग लावावी लागत असल्याचे मला दिसून आले. त्यांना होणारा हा त्रास कसा दूर होईल व त्यांना प्रसादही कसा मिळाले, यावर विचार केला असता, रांगेतच मोफत प्रसादलाडूवाटपाची कल्पना सुचली. माझ्या या कल्पनेला समितीच्या अन्य सदस्यांनी पाठिंबा दिला आणि ही कल्पना प्रत्यक्ष अंमलात आली.

श्री साईसच्चरितात वाचावयास मिळते की, बाबा स्वत:च्या हातांनी भोजन तयार करून भक्तांना वाढीत असत. बाबांचे हे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी जेवढे शक्य होईल त्यानुसार प्रत्येक दिवशी भक्तांना नि:शुल्क प्रसादभोजन देण्याची योजना आम्ही आखली. त्यानुसार २०१३ या वर्षात १८० दिवस भक्तांना नि:शुल्क प्रसादभोजन देण्यात आले. या नि:शुल्क प्रसादभोजनयोजनेचे २०१४ मध्ये योग्य ते व्यवस्थापन व आयोजन केल्याने पुढील २१० दिवसांकरिता दानशूर भक्तांनी आगाऊ निधी संस्थानकडे जमा केला आहे.

प्रसादालयाला मी अचानक दिलेल्या भेटीमध्ये असे आढळून आले की, प्रसादभोजनाचे वाटप करताना वाढपी कर्मचारी लहान-मोठे न पाहता परतफेरी होऊ नये म्हणून एकदम अन्न वाढतात. तसे एकदम अन्न न वाढता आवश्यकतेनुसार प्रसादभोजन वाढावे अशा सूचना प्रसादालय विभागाला देण्यात आल्या. सूचनेबरहुकूम पालन केले असता रोज १,००० किलो अन्नाची बचत होऊ लागल्याचे दिसून आले. हे लक्षात घेऊन प्रसादालयप्रमुखांना दरदिवशी वाया जाणाऱ्या अन्नाचा हिशोब ठेवून अन्न वाया जाऊ देऊ नये यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले.

भक्तांना राहण्याची सोय माफक दरात व्हावी म्हणून साईआश्रमचे साध्या (विनावातानुकूलित) खोलीचे भाडे ५०० रुपयांवरून २०० रुपये व वातानुकूलित खोलीचे भाडे ९०० रुपयांवरून ५०० रुपये करण्यात आले. परिणामी भक्तांच्या येथील आवासात ९० टक्के वाढ झाली. यामुळे संस्थानचा व भक्तांचाही फायदा झाला.

काही साईभक्त पालखीसोबत दूरदूरहून चालत शिर्डीला येत असतात. या साईभक्तांसाठी साईआश्रम २ मध्ये निवास, नाष्टा, चहा, मंदिरपरिसर व प्रसादालयात जाण्या-येण्यासाठी बस आदी सोयी नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आल्या.

संस्थानतर्फे चालविण्यात येणाऱ्या रुग्णालयांमध्ये विविध आजारांवर उपचार घेण्याकरिता रुग्ण दाखल होत असतात. त्यावेळी त्यांच्यासोबत येणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांना राहण्याचा प्रश्न निर्माण होतो. हे लक्षात घेऊन त्यांच्याकरिता साईआश्रम २ मध्ये निवास, संस्थानच्या बसमधून रुग्णालय, प्रसादालय, समाधिस्थान आदी मंदिरपरिसरातील ठिकाणांपर्यंत प्रवास या सोयी नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आल्या.

शिर्डीपरिसरातील वाड्यावाड्यांवरील, तसेच खेड्यापाड्यांतील जे रुग्ण रुग्णालयापर्यंत पोहचू शकत नाहीत, तसेच काही रुग्ण आर्थिक परिस्थितीमुळे व अंधश्रद्धेमुळे उपचारांपासून वंचित राहतात अशा

रुग्णांना घरपोच मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी रुग्णवाहिकेतून फिरता दवाखाना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार या योजनेचा प्रारंभ २०१३ मध्ये दिनांक १४ जानेवारीला मकरसंक्रांतीच्या शुभमुहूर्तावर करण्यात आला. या सेवेला मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे त्यात विस्तार करण्यात येऊन चार मार्गांवर ही सेवा देण्यात येत आहे. या रुग्णवाहिकेसोबत एक वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, वॉर्ड बॉय व संबंधित इतर स्टाफ असतो. प्रत्येक दिवशी विविध मार्गांवर ही सेवा देण्यात येत असते. त्याद्वारे गरीब गरजू रुग्णांवर उपचार केले जातात, त्यांना मोफत औषधे दिली जातात. आजवर सुमारे ६०,००० रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेचा संपूर्ण जिल्ह्यात विस्तार करण्याच्या दृष्टीने संस्थान विचार करीत आहे, त्यानुसार पावले उचलत आहे.

साईसमाधीच्या दर्शनाकरिता येणाऱ्या व्हीआयपींची संख्या दिवसागणिक वाढत आहे. हे व्हीआयपी संस्थानच्या पूर्वीच्या समितीचे सदस्य व अधिकारी आदींची शिफारस घेऊन येतात. यांची संख्या दरदिवशी किमान २,००० ते ३,००० असते. काकड आरतीसाठी सर्वसाधारण साईभक्त साईसमाधिमंदिरासमोर रात्रभर रांगेत उभे असतात. मात्र, मंदिरात अगोदरच जवळजवळ ३००-३५० व्हीआयपींनी केलेल्या गर्दीमुळे रांगेत प्रथम क्रमांकावर उभ्या असलेल्या भक्तालाही आरतीचा लाभ घेता येत नाही. एवढेच नव्हे, तर हे व्हीआयपी काकड आरती, माध्यान्ह आरती, धूपारती व शेजारती या चारही आरत्यांना उपस्थित राहता यावे म्हणून आग्रह धरीत असतात. ही बाब लक्षात आल्यावर रांगेत उभ्या राहणाऱ्या भक्तांना न्याय मिळावा म्हणून सर्व आरत्यांसाठी पेड पासेस सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. ऑनलाईन आरक्षित पासेसची संख्याही मर्यादित करण्यात आली. परिणामी जे व्हीआयपी सर्व आरत्यांकरिता आग्रह धरीत ते एखाददुसऱ्या पेड आरतीला उपस्थित राहू लागले. त्यामुळे रांगेत उभ्या राहणाऱ्या अधिकाधिक भक्तांना आरतीला उपस्थित राहणे शक्य होऊ लागले. यामुळे प्रशासनाच्या कामात सुलभता तर आलीच, त्याचबरोबर संस्थानच्या आर्थिक उत्पन्नातही वाढ होऊ लागली. दिनांक १८ नोव्हेंबर २०१३ रोजी या योजनेची सुरुवात करण्यात आली. आतापर्यंत या योजनेतून संस्थानला १,८०,४१,९००/- रुपये उत्पन्न मिळाले. याचा उपयोग गरीब रुग्णांना नि:शुल्क औषधे व प्रसादभोजन देण्यासाठी करण्यात येत आहे.

अनेक कल्पना मनात आहेत आणि भक्तांचे दर्शन सुखदायी व्हावे यासाठी त्या प्रत्यक्षात उतरविणे आवश्यक आहे. दर्शनरांगसंकुल विचाराधीन आहे. या संकुलात किमान २५,००० भक्त सामावून घेण्याची क्षमता असेल. त्याअंतर्गत प्रतिक्षालयात कॅन्टीन, टॉयलेट आदी सुविधा उपलब्ध असतील. शारीरिक व मानसिकदृष्ट्या विकलांग, बालकामगार आणि बालगुन्हेगार यांच्यासाठी एक निवासी शाळा बांधण्याचा विचार मनात घोळत असे. अशा प्रकारची शाळा सुरू करण्यासाठी किमान ५ ते १० एकर जमीन दान देईल अशा दानशूर व्यक्तीच्या मी शोधात होतो. ही शाळा दरवर्षी किमान १०,००० विद्यार्थी-विद्यार्थिनींना आदर्श नागरिक घडवेल अशी तरतूद त्यात होती. मात्र, उल्लेखित योजना प्रत्यक्षात अमलात आणणे राहून गेले, याची खंत मनाला लागून राहिली.

संस्थानबाबत अनेक गैरसमज आहेत. संस्थानकडे भरपूर पैसा असताना शिर्डी गाव अस्वच्छ आहे, संस्थान त्यासाठी काही करत नाही, असे भक्तांना वाटते. संस्थानने चांगले रस्ते निर्माण करावेत अशा प्रकारच्या अपेक्षा भक्तांना संस्थानकडून आहेत. परंतु, अधिनियमानुसार ही कामे संस्थानच्या अखत्यारीच्या बाहेरील आहेत. संस्थानकडील अधिकार हे मर्यादित आहेत. मंदिरपरिसरात भक्तांसाठी जे काही करता येईल तेवढेच संस्थान करू शकते. संस्थानबाहेरील पदपथावरील अतिक्रमणे हटविण्याचा अधिकारही संस्थानला नाहीत. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचेही सहकार्य लाभत नाही. शिर्डीविकासाच्या बऱ्याच योजना सरकारदरबारी मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत.

संस्थानचा अध्यक्ष म्हणून माझ्या कारकीर्दीत मला साई सर्वांतर्यामी असल्याचा बोध झाल्याने मी साईंना साईसमाधीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांमध्ये शोधू लागलो. आपण साईंना उगीचच इतरत्र शोधत असतो, असे मला वाटते. यासंबंधीचे पुढील यथोचित हिंदी भजन हे सिद्ध करून दाखविते :-

*जरा तो इतना बता दो साईं*
*लगी ये कैसी लगा रहे हो*
*मुझी में रह कर मुझी से अपनी -*

*ये खोज कैसी, करा रहे हो।*
*हृदय भी तुम हो, तुम ही हो प्रितम*
*प्रेम तुम हो, तुम ही हो जीवन*
*पुकारता मन तुम्ही को*
*फिर क्यों*
*तुम ही तो मन में, समा रहे हो।*
*प्राण तुम हो, तुम ही हो स्पंदन*
*नैनं तुम हो, तुम ही हो दर्शन*
*तुम ही को लेकर, तुम ही को ढूँढू*
*ये रीत कैसी चला रहे हो।*

संस्थानच्या त्रि-सदस्यीय समितीने ३० मार्च २०१२ ते २० मार्च २०१४ पर्यंत (माझ्या कारकीर्दीच्या काळापर्यंत) अनेक भक्तोपयोगी व गरीब रुग्णांच्या हिताचे निर्णय घेतले. त्यातील काही ठळक निर्णय खालीलप्रमाणे आहेत :-

१. मोफत प्रसादलाडूचे वितरण - १५ ऑगस्ट २०१३ पासून साईसमाधीचे रांगेतून दर्शन घेणाऱ्या प्रत्येक भक्ताला प्रत्येकी ५० ग्रॅम वजनाचे दोन प्रसादलाडू देण्यात येऊ लागले आहे.

२. अन्नपदार्थांच्या दर्जाच्या नियंत्रणासाठी प्रयोगशाळेची उभारणी

३. शासकीय दराने जाहिराती देणे

४. दरदिवशीच्या आरत्यांकरिता पेड पासेस

५. मतिमंद मुला-मुलींकरिता आयुष्यभर मोफत वैद्यकीय उपचार व औषधे

६. 'श्री साईनाथ स्तवनमंजरी' या मराठी पुस्तिकेचा तमीळमध्ये, 'भक्तलीलामृत' या मराठी पुस्तकाचा हिंदीमध्ये व दासगणूमहाराजांच्या मराठीतील पुस्तकाचा गुजराती व अन्य भाषांमध्ये अनुवाद

७. दर्शनरांगसंकुलाचे काम अंतिम टप्प्यात

८. संस्थानच्या भक्तांसाठी असलेल्या निवासी खोल्यांसाठी अनामत रक्कम घेणे बंद

९. संस्थानपरिसरात प्लॅस्टिक पिशव्या व पॉलीथीन कपांच्या वापरावर बंदी

१०. श्रींची मूर्ती व समाधीच्या सुरक्षेबाबत उपाययोजना

११. सर्पदंश व श्वानदंश आदींच्या उपचारासाठी मोफत औषधोपचार

१२. अंध, अपंग, मतिमंद, मूकबधीर, तसेच धार्मिक शिक्षण संस्थांना मोफत अन्न.

१३. श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयाद्वारे विविध आजारांवर मोफत शिबिरांचे आयोजन

१४. संस्थानच्या दोन्ही रुग्णालयांत आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांची बाह्यरुग्णविभागात मोफत तपासणी

१५. ज्येष्ठ नागरिकांसाठी सर्वसाधारण आरोग्य तपासणी शिबीर

१६. शिर्डी व आजूबाजूच्या ग्रामस्थांसाठी फिरता दवाखाना

१७. मोफत मोतिबिंदू शिबीर

१८. मधूमेहनिदान व त्यावरील वैद्यकीय उपचार शिबीर

१९. तिरळ्या नजरेच्या व्यक्तींसाठी मोफत शिबीर

२०. स्क्लेरोथेरपी (मूळव्याधीवर इंजेक्शनद्वारे उपचार) मोफत शिबीर

२१. कृत्रिम सांधेरोपण शिबीर

२२. जयपूर (कृत्रिम) फूट शिबीर

२३. कर्करोग जनजागृती शिबीर

२४. संस्थानच्या त्रि-सदस्यीय समितीने संस्थानच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जनरिक औषधांची शिफारस करणे आवश्यक केले. संस्थानने फक्त जनरिक औषधेच खरेदी केल्याने रुग्णांची औषधखरेदीवरील किमान ४०% रक्कम वाचली, जिचा उपयोग गरीब रुग्णांसाठी केला गेला. यामुळे संस्थान किमान ७३ लाख रुपयांची बचत करू शकले.

२५. त्रि-सदस्यीय समितीने प्रथमच सर्व प्रकारच्या व्यवहारांत ई-टेंडर प्रक्रिया सुरू केल्याने व्यवहारात पारदर्शकता आली आहे.

२६. समाजातील दुर्बल घटकांतील मुलांना मोफत शिक्षण दिले जात आहे.

२७. कर्मचाऱ्यांना त्यांचे लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात आली आहेत.

२८. राजीव गांधी जीवनदायी योजना सुरू करण्यात आली आहे.

२९. साईआश्रम - १ व साईआश्रम - २ या इमारती साईभक्त श्री. के. व्ही. रमणी यांच्या अर्थसहाय्याने





बांधण्यात आल्या आहेत. त्यापैकी साईआश्रम - १ मध्ये १५३० खोल्या साईभक्तांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, तर साईआश्रम - २ मध्ये प्रत्येकी १८ बेड असलेले १९२ डॉर्मेटरी हॉल उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या सोईंमुळे सुमारे ११७७६ साईभक्तांना निवाससुविधा उपलब्ध झाली आहे.

३०. संस्थानच्या रुग्णालयात आंतररुग्ण म्हणून भरती होणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांकरिता निवासाची मोफत सोय उपलब्ध करून देण्यात येऊ लागली आहे.

३१. दासगणू महाराज, ज्यांनी साईबाबांच्या जीवनावर बरेच लिखाण केले त्यांच्या स्तवनमंजरीचे पठण त्यांच्या पुण्यतिथी दिनी करण्यात येऊ लागले आहे.

३२. पायी येणाऱ्या अंध व शारीरिकदृष्ट्या विकलांग भक्तांची राहण्याची, दर्शनाची व जेवणाची मोफत व्यवस्था करण्यात येऊ लागली आहे.

३३. रामनवमी २०१४च्या उत्सवापासून सर्व भक्तांना व गावकऱ्यांना प्रत्येक उत्सवास, म्हणजे रामनवमी, गुरुपौर्णिमा व दसरा या उत्सवांत दानशूर भक्तांतर्फे संस्थानद्वारे मोफत प्रसादभोजन देण्याचे ठरविण्यात आले आहे.

३४. विजयादशमी उत्सवात आराधना विधीचे असे आयोजन करण्यात येणार आहे की, तो विधी त्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व भक्तांना व गावकऱ्यांना पाहता येईल आणि त्याचे थेट प्रक्षेपण मोठ्या प्रमाणावर करण्यात येईल.

३५. मा. राष्ट्रपती महोदय श्रीयुत प्रणब मुखर्जी यांनी बाबांच्या समाधीस भेट दिली होती. त्यावेळी त्यांचे स्वागत आणि आदरातिथ्य करण्याचा योग मला आला. याचप्रमाणे साईआश्रम इमारतींच्या उद्घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री महोदय श्रीयुत पृथ्वीराज चव्हाण यांचे स्वागत करण्याचा योग आला. त्यावेळी दुष्काळनिवारणार्थ असलेल्या मुख्यमंत्री निधीसाठी संस्थानतर्फे रक्कम रु. २५ कोटींचा धनादेश देण्यात आला.

२० मार्च २०१४ रोजी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश (अहमदनगर) म्हणून माझा कार्यकाल संपून मी सेवानिवृत्त झालो. त्यानिमित्त दिनांक १.४.२०१४ रोजी संस्थानतर्फे मला निरोप देण्यात आला. मला ठाऊक आहे की, करणे आवश्यक असलेल्या बऱ्याच गोष्टी पूर्ण करणे राहून गेले आहे. साईबाबा व साईभक्तांसाठी मी माझ्यापरीने माझे संस्थानप्रती कर्तव्य पार पाडण्याचा आटोकाट प्रयत्न केला. माझ्या इतर प्रारंभिक कामकाजामुळे मी संपूर्ण वेळ बाबांच्या सेवेत देऊ शकलो नाही, याची सल मला लागून राहिली आहे. असे असले तरी जे काही अल्पसे कार्य मला करता येणे शक्य झाले त्याबाबत मी पूर्ण समाधानी आहे. सलग दोन वर्षे मला श्री साईबाबांचा आराधना विधी (श्राद्धविधी) करावयास मिळाला. हा विधी केवळ मुलाकरवीच केला जातो. यापेक्षा भाग्याची गोष्ट आयुष्यात आणखी ती कोणती असेल बरं!

आयुष्यातील पुढील काळात बाबांची दोन वर्षांतील अशी सेवा करायला मिळणार नाही याची मला जाणीव आहे. त्यामुळे जीवनात पोकळी निर्माण होणार हे निश्चित.

बाबांच्या सेवेशिवायचे माझे आयुष्य व्यक्त करणारे पुढील हिंदी साईभजन मला या अंत:करण भरून आलेल्या प्रसंगी आठवते :-

*(पृष्ठ क्र. २४वर)*

कै. गोविंद रघुनाथ दाभोलकरकृत 'श्री साईसच्चरित' या मूळ ग्रंथावर आधारित

# ।। अभंग श्री साईसच्चरित ।।

## अध्याय ५१वा



श्री साईमहाराजांचे कृपापात्र भक्त काकासाहेब दीक्षित यांना प्रारंभी श्री साईबाबांविषयी काहीच माहिती नव्हती. काकासाहेबांना लंडन शहरी गाडीत चढताना पाय घसरल्याने पांगळेपण आले. मनाचा लंगडेपणा घालविणाऱ्या खऱ्या सद्गुरुच्या शोधात, अपेक्षेत काकासाहेब होते. श्री बाबांच्या कृपेनेच नानासाहेब चांदोरकर या दीक्षितांच्या महाविद्यालयीन मित्राशी गाठभेट झाली आणि श्री साईदर्शनाचा लाभ काकासाहेबांना झाला. खऱ्या अर्थाने दीक्षितांचे मनाचे पांगळेपण पळाले आणि त्यांना आत्मबोध झाला.

श्री साईबाबा हे आपल्या भक्तांच्या विसाव्याचे स्थान आहेत. त्यांना ते परम सुखाची प्राप्ती करून देतात. बाबांच्या दर्शनाची जो इच्छा धरतो, त्याची इच्छा बाबा आजही पूर्ण करतात. दीक्षितांची साईभक्ती आणि साईसेवा ही अजोड होती. बाबांच्या समक्ष आणि बाबांच्या देहत्यागानंतर दीक्षितांच्या हातून होणारे कार्य जाणून बाबांनी काकासाहेबांना एकदा सांगितले, ''तुज मी विमानांत नेईन.'' ५ जुलै १९२६ रोजी, ज्येष्ठ वद्य एकादशीस आगीनगाडीतून प्रवास करीत असताना काकासाहेबांचा हेमाडपंतांबरोबर श्री साईंविषयक सत्संग चालू होता. समर्थ साईंच्या वार्तांत चूर असतानाच एकाएकी काकासाहेबांनी हेमाडपंतांच्या खांद्यावर अलगद मान टेकवली आणि त्यांना सहज मरण आले.

नांदेडमधील प्रसिद्ध वकील पुंडलीकराव हे आंध्रातील राजमहेंद्र येथील दत्तावतार म्हणून ओळखले जाणारे श्री वासुदेवानंद सरस्वती तथा टेंबेस्वामींच्या दर्शनास गेले होते. संभाषणात पुंडलीकराव हे शिर्डीला जाणार असल्याचे कळल्यावर स्वामींनी पुंडलीकरावांच्या हाती श्री साईंना श्रीफळ भेट दिले व नमस्कारही सांगितला. पुढे शिर्डीला जात असताना मार्गी पुंडलीकराव व बरोबरच्यांकडून अनावधानाने चिवड्याबरोबर श्रीफळही भक्षण करण्यात आले. त्याची सविस्तर कथा व त्या कथेची फलश्रुतीही अतिसुंदर आहे.

मुंबईतील सांताक्रूझला धुरंधर नावाचे हरिभक्त बंधू राहत होते. त्यातील एक बंधू बाळाराम विठ्ठलभक्त होते. धुरंधर बंधू शिर्डीला येण्यापूर्वीच ''आज माझ्या दरबारचे लोक। येणार आहेत येथें अनेक।'' म्हणून बाबा उपस्थितांना सांगत होते. याच मुक्कामी दुपारी श्री बाबांची चिलीम पिण्याचा कार्यक्रम चालू असता, धुरंधरांना ती चिलीम ओढण्याचा भाग्ययोग आला. हा महाप्रसादच होता.

या तिन्ही कथा हेमाडपंतांनी या अध्यायी रसाळ शैलीत सांगितलेल्या आहेत.

।। अथ अभंग श्री साईसच्चरित।। अध्याय ५१।।

श्री गौरीगणेशा। तुज नमस्कार। करावा स्वीकार। कार्यारंभी ।।१।। सरस्वतीमाते। द्यावी मज मती। शब्दरूपी मोती। गुंफण्यास ।।२।। गुरुनाथ तुम्हा। साष्टांग नमन। तुम्हीच कारण। या ग्रंथासी ।।३।। कुलदेवतेचे। करून स्मरण। करितो वंदन। पुन: पुन्हा ।।४।। प्रभू रामचंद्रा। तुजला वंदन। धरिले चरण। कृपा करा ।।५।। सद्गुरुनाथा। शिर्डीसाईनाथा। सदा राहो माथा। तंव पदीं ।।६।। जय जय गुरु। साईभक्तोद्धारा। सिद्धीच्या दातारा। गुरुश्रेष्ठा ।।७।। पटवून दिला। आम्हास गीतार्थ। झाले कृपावंत। गुरूराय ।।८।। उष्णतेचा त्रास। सोसावा म्हणून। उगवे चंदन। मलयगिरी ।।९।। सुखवावयास। अवघ्या जनांस। आणिले मेघांस। नभांतरी ।।१०।। किंवा ईश्वराचे। व्हावया पूजन। प्रकटे सुमन। वसंतात ।।११।। अथवा कराया। श्रोतृसमाधान। चालली आख्यान। परंपरा ।।१२।। श्रोत्यांनी ऐकता। हे साईचरित्र। दोघेही पवित्र। श्रोते-वक्ते ।।१३।। समर्थ साईंचे। ऐकता चरित्र। श्रोत्यांचे पवित्र। होती कान ।।१४।। समर्थ साईंचे। वाचिता चरित्र। वक्त्याचे पवित्र। होई मुख ।।१५।। मागील अध्यायी। घडले वर्णन। कैसे निरसन। अज्ञानाचे ।।१६।। अज्ञान संपता। उपजेल ज्ञान। जेणे निरसन। अज्ञानाचे ।।१७।। भगवद्गीतेच्या। शेवटी शेवटी। श्रीकृष्ण पुसती। अर्जुनास ।।१८।। झाले का सांगावे। मोहनिरसन। हाच स्पष्ट प्रश्न। त्यांनी केला ।।१९।। पार्थाने उत्तर। दिले श्रीकृष्णाला। मोह न राहिला। माझ्या मनी ।।२०।। ज्ञानप्राप्ती झाली। असे ना म्हणाला। पण ज्ञानी झाला। आपोआप ।।२१।। अज्ञान संपता। उपजले ज्ञान। जेणे निरसन। त्या मायेचे ।।२२।। मोह म्हणजेच। असते अज्ञान। शब्द मात्र दोन। दिसायला ।।२३।। शब्द जरी दोन। वेगळे दिसती। अर्थाने ठरती। ते समान ।।२४।। आता पाहू चला। अध्याय नूतन। दीक्षितां लागून। हे कथन ।।२५।। कैसे दीक्षितांना। शिर्डीत आणिले। आणि बसविले। साईपदीं ।।२६।। शिर्डीचा संबंध। कसा काय आला। वृत्तांत सगळा। आता पाहू ।।२७।। काका दीक्षितांच्या। कितीतरी गोष्टी। पाहिल्या चरित्री। वेळोवेळी ।।२८।। परि ते आरंभी। कैसे शिर्डीत। हे न अवगत। सकळांस ।।२९।। अनंत जन्मांचे। पुण्य पदरात। तेणे झाली भेट। समर्थांची ।।३०।। सद्गुरुची भेट। होताच शिष्याला। दिव्यत्वाचा जाहला। अनुभव ।।३१।। नवीन अध्यायी। कथा पाहू तीन। सुरेख वर्णन। ते ऐकू या ।।३२।। कथा त्या ऐकून। आनंद होईल। संतोष मिळेल। या मनास ।।३३।। परमार्थप्राप्ती। हाती येण्यासाठी। उपाय करिती। कोटी-कोटी ।।३४।। परि सद्गुरुच्या। कृपादृष्टीविना। हातात पडेना। परमार्थ ।।३५।। याच विषयाचे। सुंदर कथन। श्रोतियांचे मन। तोषविल ।।३६।। असे या अध्यायी। पवित्र कथन। जेणे समाधान। भाविकांचे ।।३७।। श्रोत्यांनी आपुले। साधावया हित। ऐकावे चरित्र। शांत चित्ते ।।३८।। हरि दीक्षित हे। जरी त्यांचे नाव। प्रचलित नाव। काका ऐसे ।।३९।। एकोणीसशे। नऊ साल आले। काकांनी ऐकिले। साईनाम ।।४०।। नऊ साली त्यांच्या। वृत्त आले कानी। साई नामे कोणी। थोर संत ।।४१।। तेच काका पुढे। साईभक्त झाले। सेवेत रमले। साईपदीं ।।४२।। विश्वविद्यालय। शिक्षणानंतर। काळ गेल्यावर। खूप वर्षे।।४३।। चांदोरकर जे। श्रेष्ठ साईभक्त। कामाच्या निमित्त। लोणावळ्यात ।।४४।। दीक्षित तयांचे। फार जुने मित्र। तिथे झाली भेट। अचानक ।।४५।। सुख-दुःखाच्या त्या। खूप वार्ता झाल्या। गोष्टी आठविल्या। त्या पूर्वीच्या ।।४६।। लंडन शहरी। चढता गाडीत। झाला अपघात। दीक्षितांना ।।४७।। पाय घसरता। उद्भवली व्यथा। उपाय करता। नाही गुण ।।४८।। बोलता सहज। दोघांच्या चर्चेत। दुखण्याची गोष्ट। पुढे आली ।।४९।। पाय घसरून। खाली जे पडले। दुखणे लागले। कायमचे ।।५०।। दुखण्याची गोष्ट। नानांनी ऐकिली। त्यांच्या मनी आली। साईमूर्ती ।।५१।। त्यावरी काकांना। सल्ला देती नाना। उपाय ऐका ना। माझा एक।।५२।। माझ्यासवे चला। गुरूंचे दर्शना। एवढे ऐका ना। काका माझे ।।५३।। संतशिरोमणी। गुरू साईनाथ। भक्त दर्शनार्थ। शिर्डीत ।।५४।। साईगुणगान। नानांनी गायिले। समोर मांडिले। दीक्षितांच्या ।।५५।। माझा भक्त जरी। समुद्राच्या पार। पायी त्याच्या दोर। मी बांधतो ।।५६।। माझ्या मनी येता। खेचून आणतो। पायीं बसवितो। त्याला माझ्या ।।५७।। असे हे प्रसिद्ध। साईंचे वचन। नानांनी कथन। केले त्यांना ।।५८।। म्हणाले बाबांचे। नसता आपण। तयांचे खेचून। घेणे नाही ।।५९।। समर्थांचे जर। नसाल आपण। तयांचे दर्शन। अवघड ।।६०।। हीच समर्थांची। मोठी आहे खूण। घडेल दर्शन। त्यांच्या इच्छे ।।६१।। असे हे ऐकून। साईंचे वर्णन। झाले समाधान। दीक्षितांचे ।।६२।। दीक्षित म्हणाले। मी तिथे जाईन। दर्शन घेईन। समर्थांचे ।।६३।। माझिया पायाची। काय ती किंमत। देह नाशिवंत। इथे आहे ।।६४।। तुमच्या

गुरुच्या। दर्शना जाईन। मागणी करीन। मोक्षपदाची।।६५।। थोडक्या सुखाची। मज ना कामना। त्याची न याचना। मी करीन।।६६।। ईश्वराशिवाय। नाही खरे सुख। ठेवा अमोलिक। तोच एक।।६७।। तुमच्या गुरुचा। होईन सेवक। एका अमोलिक। सुखासाठी।।६८।। राहू दे तसाच। माझा अधूपणा। त्याची विवंचना। नाही मला।।६९।। परंतु मन जे। माझे कमजोर। त्याला ताळ्यावर। आणा आधी।।७०।। हीच मी प्रार्थना। गुरूंना करीन। साकडे घालीन। एवढेच।।७१।। बहुत शिणलो। करता साधन। स्थिर नाही मन। अजूनही।।७२।। प्रयत्ने काबूत। ठेवताच मन। जाई निसटून। नकळत।।७३।। तुमच्या गुरूंचे। घेईन दर्शन। स्थिर करा मन। हे प्रार्थिन।।७४।। नश्वर देहाच्या। सौख्यी जो उदास। आणि मनी हौस। श्रेष्ठ सुखाची।।७५।। असा भक्त जेव्हा। साईंना भेटतो। उल्हास वाढतो। साईमनी।।७६।। अशा भक्तासाठी। परमार्थप्राप्ती। करूनिया देती। साईनाथ।।७७।। निवडणूक होती। विधानसभेची। म्हणून सर्वांची। गडबड।।७८।। हीच चर्चा तेव्हा। चहूकडे चाले। काकाही गुंतले। त्या कामात।।७९।। लोकमत तेव्हा। मिळविण्यासाठी। घेती भेटीगाठी। दीक्षितही।।८०।। फिरता-फिरता। नगर शहरी। आले दौऱ्यावरी। प्रचारास।।८१।। काका मिरीकर। नामे सरदार। दीक्षितांचे फार। जवळचे।।८२।। त्यांच्या घरी होता। मुक्काम काकांचा। ठरला भाग्याचा। तोच दिन।।८३।। नगरी घोड्यांचे। होते प्रदर्शन। जमले म्हणून। खूप लोक।।८४।। बाळा मिरीकर। प्रदर्शनासाठी। हजेरी लावती। शहरात।।८५।। ज्यासाठी दीक्षित। नगरात आले। कार्य आटोपले। ते सगळे।।८६।। कसे काय आता। जावे शिर्डीला। विचार चालला। त्यांच्या मनी।।८७।। दृष्टीपुढे फक्त। शिर्डीचा मार्ग। दर्शनाचा योग। येण्यासाठी।।८८।। घडावा बाबांचा। दर्शनाचा योग। एकचि उद्योग। हा दीक्षितां।।८९।। शिर्डीस येईल। कोण बरोबर। बाबांच्या समोर। जो नेईल।।९०।। घालील मजला। कोण पायांवर। सतत विचार। हाच मनी।।९१।। निवडणुकीचे। कार्य पुरे होता। शिर्डीस आता। कैसे जावे।।९२।। दीक्षितांच्या मनी। चिंता ही लागली। विनवणी केली। मिरीकरां।।९३।। काका मिरीकर। आणि त्यांचे पुत्र। याच विचारात। तेव्हा होते।।९४।। दीक्षितांच्या संगे। कोणी बरे जावे। कसे त्यांना न्यावे। दर्शनास।।९५।। दोघांपैकी एक। असता संगती। नको तयांसाठी। दुजा कोण।।९६।। परस्पर चर्चा। जेव्हा ही चालली। घटना घडली। वेगळीच।।९७।। मनुष्याच्या मनी। मानवी कल्पना। वेगळी योजना। ईश्वराची।।९८।। काका दीक्षितांच्या। शिर्डीच्या गमना। घडली घटना। अकल्पित।।९९।। इकडे काकांची। ऐसी तळमळ। पहा चळवळ। दुसरीकडे।।१००।। पाहून भक्तांची। कामना प्रबळ। झाली तळमळ। साईमनी।।१०१।। याच विचारात। असता दीक्षित। आले नगरात। शामराव।।१०२।। जैसे शामराव। आले नगरात। जाहले विस्मित। सारेजण।।१०३।। माधवरावांना। सासऱ्यांची तार। यावे लवकर। नगरात।।१०४।। सासूबाई त्यांच्या। पडल्या आजारी। भेटीस सत्वरी। यावे आता।।१०५।। तार मिळताच। त्वरित निघाले। नगरात आले। शामराव।।१०६।। घेतले कुटुंब। त्यांनी बरोबरी। व चिथळीवरी। पोहोचले।।१०७।। तीन वाजताची। गाडी पकडती। उभयतां येती। ते नगरी।।१०८।। टांगा घेऊनिया। दारी पोहोचले। खाली उतरले। दोघेजण।।१०९।। पानसे व गद्रे। त्याचवेळी तेथे। निघालेले होते। प्रदर्शनास।।११०।। माधवरावांना। पाहून रस्त्यात। झाले अचंबित। दोघेजण।।१११।। मनात म्हणती। पहा हे सुदैवे। शिर्डीचे बडवे। इथे आले।।११२।। याहून चांगला। कोण सोबतीस। नेण्या शिर्डीस। दीक्षितांस।।११३।। माधवरावांसी। मग दोघेजण। घेती बोलावून। भेटीसाठी।।११४।। मिरीकरांकडे। आलेत दीक्षित। सांगती हे वृत्त। शामरावां।।११५।। दीक्षित आमुचे। फार जुने मित्र। भेटावे त्वरित। त्यांना तुम्ही।।११६।। तुमची काकांशी। होईल ओळख। ते फार उत्सुक। शिर्डीसाठी।।११७।। तुमच्या भेटीने। त्यांचे समाधान। भेटावे म्हणून। तुम्ही त्यांस।।११८।। निरोप देऊन। पानसे निघाले। वृत्त कळविले। दीक्षितांना।।११९।। दीक्षितांना जसे। वृत्त हे कळले। प्रफुल्लित झाले। फार मनी।।१२०।। सासुरवाडीस। शामराव जाती। चौकशी करती। ते सासूची।।१२१।। ठीकठाक आहे। सासूची प्रकृती। कळली माहिती। शामरावां।।१२२।। तोच मिरीकर। निरोप धाडती। बोलावून घेती। शामरावां।।१२३।। शामराव मग। विनंती मानती। भेटीस निघती। दीक्षितांच्या।।१२४।। हीच त्या दोघांची। पहिलीवहिली। भेट घडवली। मिरीकरांनी।।१२५।। त्याच दिनी रात्री। दहा वाजताची। गाडी शिर्डीची। पक्की केली।।१२६।। शिर्डीस जाणे। जसे पक्के झाले। नवल घडले। काय पहा।।१२७।। बाळा मिरीकर। जरा पुढे

होती। पडदा सारती। छबीवरील ।।१२८।। छबी ती बाबांची। पडद्याच्या आत। पाहून विस्मित। काका होती ।।१२९।। छबी ती बाबांची। अत्यंत सुंदर। मेघा करी आदर । तिचा खूप ।।१३०।। मेघा हा बाबांचा। अतिश्रेष्ठ भक्त। म्हणे भोलेनाथ। तो साईंस ।।१३१।। छबी ती शिर्डीची। काच फुटलेली। नगरी आणली। दुरुस्तीस ।।१३२।। तीच तसबीर। होऊन दुरुस्त। जणू प्रतीक्षेत। दीक्षितांच्या ।।१३३।। अश्वप्रदर्शन। अजून चालले। तेणे अडकले। मिरीकर ।।१३४।। म्हणूनि विनंती । माधवरावांना । न्यावे पाहुण्यांना । शिर्डीस ।।१३५।। पडदा काढून। छबी खुली केली। आणि हाती दिली। माधवांच्या ।।१३६।। प्रथम पडता। दृष्टीस तसबीर। आनंदनिर्भर। काका मनी ।।१३७।। पाहून छबीस। वंदन करती। मनात म्हणती। धन्य झालो ।।१३८।। घडली अशी ही। विचित्र घटना। नसता कल्पना। काही मनी ।।१३९।। पाहून बाबांचे। रम्य छायाचित्र। पाणावले नेत्र। दीक्षितांचे ।।१४०।। जयांच्या दर्शनाची। ओढ मनी होती। तेच की दिसती। या छबीत ।।१४१।। तेणे दीक्षितांचे। भारावले मन। आणिक दाटून। कंठ आला ।।१४२।। अतिउच्च होते। दीक्षितांचे भाग्य। तेणे हा अलभ्य। लाभ त्यांना ।।१४३।। छबी ती बाबांची। करण्या दुरुस्ती। घरी आली होती। त्याचवेळी ।।१४४।। दीक्षितांच्या मनी। जशी होती भक्ती। तशीच प्रचीती। बाबा देती ।।१४५।। छबी तीही यावी। शिर्डीलागूनि। मिरीकरांच्या भवनी। याचवेळी ।।१४६।। त्याच समयास। दीक्षित ते स्थानी। योग हा जुळूनि। आला असा ।।१४७।। लोणावळा गावी। नानांचे दर्शन। झालेले भाषण। तयांसवे ।।१४८।। त्यावेळी काकांना। साईभेटीसाठी। लागलेली होती। ओढ मनी ।।१४९।। शामरावांसह। निघाले दीक्षित। ठरता निश्चित। शिर्डीयात्रा ।।१५०।। भोजनानंतर। तेच दिनी रात्री। दोघेजण येती। स्टेशनात ।।१५१।। दुसऱ्या वर्गाची। तिकिटे काढती। प्रतीक्षा करती। गाडीसाठी ।।१५२।। दहा वाजताच। अग्निरथध्वनी। पडू लागे कानीं। हळुहळू ।।१५३।। प्रवासी डब्यात। चिक्कार भरूनि। दिसे हे नयनीं। उभयतां ।।१५४।। गर्दी ती पाहून। दोघे गांगरती। मनी ठरवती। मागे जावे ।।१५५।। इतक्यात पहा। चमत्कार झाला। गाडीचा भेटला। गार्ड त्यांना ।।१५६।। गार्ड दीक्षितांच्या। ओळखीचा होता। तेणे सारी चिंता। दूर झाली ।।१५७।। प्रथम वर्गात। त्यांना बसवले। सारेच घडले। मनाजोगे ।।१५८।। गाडीत बसता। समर्थांच्या गोष्टी दीक्षितां सांगती। शामराव ।।१५९।। साईकथामृत। पडताच कानीं। काका भारावून। पहा जाती ।।१६०।। गप्पागोष्टी अशा। बाबांच्या करीत। कोपरगावात। दोघे आले ।।१६१।। मोठ्या आनंदात। खाली उतरले। समोर दिसले। नाना त्यांना ।।१६२।। पाहून समोर। चांदोरकरांना। आनंद दोघांना। फार झाला ।।१६३।। चांदोरकरही। त्याच समयास। साईदर्शनास। आले होते ।।१६४।। पाहून असा हा। योग अकल्पित। आनंदविभोर। तिघे झाले ।।१६५।। मग तिघेजण। टांगा ठरवती। शिर्डीस निघती। लगोलग ।।१६६।। वाटेत थांबून। गोदास्नान केले। आणि मग आले। शिर्डीत ।।१६७।। पुढे घडताच। बाबांचे दर्शन। दीक्षितांचे मन। विरघळले ।।१६८।। परमात्म्याची जाणीव। काकांना होऊनि। वाहती नयनीं। अश्रू त्यांच्या ।।१६९।। मीही तुझी खूप। पाहूनिया वाट। पाठविले थेट। या शाम्यास ।।१७०।। नगरास तुझी। घ्यावयास भेट। वदती हे स्पष्ट। साई त्यांस ।।१७१।। ऐकून बाबांचे। ऐसे उद्गार। काकांचे शरीर। रोमहर्षित ।।१७२।। झाले अश्रुपूर्ण। काकांचे नयन। स्वानंद जीवन। ओसंडले ।।१७३।। मनोविकारांचा। अतिरेक झाला। आणिक दाटला। कंठ त्यांचा ।।१७४।। सर्वांगी घामाच्या। सुरू झाल्या धारा। भरला कापरा। शरीरास ।।१७५।। आत्मानंदी मग्न। झाली चित्तवृत्ती। नयन मिटती। अर्धवट ।।१७६।। आज या दृष्टीस। मोठा लाभ झाला। सद्गुरु भेटला। आज मला ।।१७७।। असे मनोमनी। दीक्षित म्हणती। आणि नम्र होती। साईपदीं ।।१७८।। धन्यता वाटली। मनी फार मोठी। पायांसी घालती। घट्ट मिठी ।।१७९।। पुढे खूप काळ। साईसेवा केली। चरणीं जडली। निष्ठा फार ।।१८०।। समर्थ साईंची। कृपा संपादिली। सेवेसी वाहिली। निजकाया ।।१८१।। यथासांग सेवा। घडावी म्हणून। मठी ती बांधून। ठेवली एक।।१८२।। शिर्डीत वस्तीही। बहुसाल केली। कीर्ती वाढवली। समर्थांची ।।१८३।। साई हे भक्तांचे। विश्रांतीचे स्थान। जिथे समाधान। सुख-शांती ।।१८४।। साईदर्शनाची। इच्छा ज्यांच्या पोटी। साई पुरविती। ती आनंदे ।।१८५।। चंद्राला चकोर। खूप असतात। चकोरास मात्र। चंद्र एक ।।१८६।। मातेला बालके। असती अनेक। पण सर्वां एक। माता असे ।।१८७।। सूर्याला कमळे। असती अनेक। कमळांना एक। सूर्य असे ।।१८८।। त्याप्रमाणे तुझे। भक्त अगणित। पण गुरुश्रेष्ठ। तू एकटा ।।१८९।। सद्भावे गुरुला। जाताच शरण। करतो रक्षण। तो भक्तांचे ।।१९०।।

जरी समाधिस्थ। गुरू साईनाथ। प्रचीती देतात। ते अजून ।।१९१।। जगी जे जे प्राणी। जिवंत आहेत। ते ते मरतात। अखेरीस।।१९२।। परि दीक्षितांना। बाबांचे वचन। धाडीन विमान। तुझ्यासाठी।।१९३।। जसे समर्थांनी। दिधले वचन। तसेच मरण। दीक्षितांस।।१९४।। वाचेने करता। साईगुणगाण। पातले मरण। दीक्षितांस।।१९५।। तेच मी समक्ष। डोळ्यांनी पाहिले। कसे काय आले। ते मरण।।१९६।। अग्निरथी तेव्हा। आम्ही दोघेजण। साईगुणगान। गात होतो।।१९७।। बोलता-बोलता। एका झटक्यात। जणू विमानात। ते बैसले।।१९८।। मान खांद्यावर। माझ्या ते टाकती। आणि बसती। विमानात।।१९९।। पाहता-पाहता। श्वास मंद झाला। दीप मालवला। दीक्षितांचा।।२००।। नाही आळापिळा। नाही घरघर। अर्पिले शरीर। धरणीस।।२०१।। मनुष्यरूपी ही। भूमिका संपली। ज्योत मिसळली। ज्योतीमध्ये।।२०२।। विमान म्हणजे। एका झटक्यात। स्वस्वरूपात स्थित। काका झाले।।२०३।। त्यांची आत्मज्योत। ब्रह्माच्या ज्योतीत। एकाच क्षणात। समरसली।।२०४।। मरणासमयी। साईपदीं ध्यान। नव्हता म्हणून। देहाभिमान।।२०५।। अंत:समयाला। समाधानी वृत्ती। तेणे मोक्षप्राप्ती। दीक्षितांस।।२०६।। तिथी होती ज्येष्ठ। वद्य एकादशी। ते ब्रह्मपदासी। पोहोचले।।२०७।। म्हणा हे काकांचे। निर्याण, निर्वाण। अथवा विमान। आले त्यांना।।२०८।। झाले साईपदीं। दीक्षित विलीन। कोणालाही मान्य। ते होईल।।२०९।। गुरुउपकारां। जे फेडू पाहती। अभक्त ठरती। या जगात।।२१०।। दृश्य पदार्थांचा। करता आहेर। कैसे उपकार। फिटतील ।।२११।। चिंतामणी जर। अर्पण कराल। चिंता वाढवाल। ती नित्याची।।२१२।। कल्पवृक्ष जरी। गुरुस अर्पाल। गुरूंना नवल। काय त्याचे।।२१३।। निर्विकल्प वस्तू। गुरू स्वयें देती। मग ऋणमुक्ती। कशी काय।।२१४।। गुरूंना परीस। अर्पण कराल। लोहाचे करेल। तो सुवर्ण।।२१५।। तसा गुरुनाथ। किमया करेल। तुम्हास पाजेल। ब्रह्मरस।।२१६।। कामधेनू जर। गुरूंना अर्पाल। ऋण ना फिटेल। ते गुरूंचे।।२१७।। गुरुनाथ स्वयें। निष्काम असती। इच्छा न धरती। कुठलीच।।२१८।। अमाप संपत्ती। जरी द्याल दान। फिटेल कुठून। त्यांचे ऋण।।२१९।। देह ओवाळून। जरी तो टाकता। अभिमान खोटा। तो ठरेल।।२२०।। देह हा केवळ। आहे नाशिवंत। दान त्याचे व्यर्थ। ठरणार।।२२१।। सत्य वस्तूचा तो। सद्गुरु दाता। असत्य अर्पिता। व्यर्थ जाई।।२२२।। म्हणूनि तयासी। जाऊन शरण। पायीं लोटांगण। ते घालावे।।२२३।। उपकार त्यांचे। नित्य आठवून। अनन्य शरण। त्यांना जावे।।२२४।। हेचि आचरण। शिष्याचे भूषण। नका जाऊ ऋण। फेडावयास।।२२५।। ऋणमुक्तीसाठी। यत्न जे करती। पहा गमावती। आत्मसुख।।२२६।। इतकी कथा ही। श्रोत्यांनी ऐकली। तहान वाढली। आणखीन।।२२७।। पाहून श्रोत्यांची। अशी उत्सुकता। लहानशी कथा। मी सांगतो।।२२८।। संसारियासम। बंधुप्रेम व्यक्त। थोर साधुसंत। करतात।।२२९।। लोकसंग्रहाची। आवड मोठी। हेच दाखवती। वेळोवेळी।।२३०।। किंवा नाना रूपे। धारण करून। देती ते शिक्षण। परमार्थाचे।।२३१।। याच विषयाचे। संक्षिप्त कथन। एकाग्र होऊन। ऐका आता।।२३२।। भेट न घडता। ओळख नसता। संत जाणतात। एकमेकां।।२३३।। 'सरस्वती' पद। धारण करते। संत एक होते। फार मोठे।।२३४।। वासुदेवानंद। नामे ओळखती। होते गोदातटी। मुक्कामास।।२३५।। कीर्तिरूपी गंगा। स्वामींची पाहून। येती भक्तजन। भेटीसाठी।।२३६।। पुंडलीकराव। वगैरे भाविक। दर्शना उत्सुक। स्वामीजींच्या।।२३७।। दर्शन घेण्याचे। त्यांनी ठरविले। आणखी निघाले। लगोलग।।२३८।। राजमहेंद्र या। प्रसिद्ध शहरी। स्वामीजींची स्वारी। मुक्कामास।।२३९।। पहाटेच्या वेळी। समस्त मंडळी। गोदातटी गेली। दर्शनास।।२४०।। नांदेड गावचे। होते हे भाविक। अत्यंत उत्सुक। भेटीसाठी।।२४१।। दिसता समोर। स्वामीजींची मूर्ती। पायांसी घालती। लोटांगण।।२४२।। कुशल-मंगल। चालली बोलणी। निघाली कहाणी। शिर्डीची।।२४३।। स्वामीजी म्हणती। गुरू साईनाथ। फार मोठे संत। या भूतली ।।२४४।। साईलागी आम्हा। आहे बंधुप्रेम। एक माझे काम। ते करावे।।२४५।। शिर्डीला जेव्हा का। दर्शनास जाल। माझे हे श्रीफळ। त्यांना द्यावे।।२४६।। आमच्या बंधूंना। करून वंदन। करावे अर्पण। हे श्रीफळ।।२४७।। स्वामी ना करती। कुणाला वंदन। असे हे बंधन। आम्हावरी।।२४८।। परि नियमाचे। कधी उल्लंघन। पदरात पुण्य। ते टाकते।।२४९।। म्हणून साईंचे। घेताच दर्शन। ठेवावे स्मरण। या गोष्टीचे।।२५०।। पुंडलीकराव। मग पुढे जाती। स्वामींचे धरती। दोन्ही पाय।।२५१।। आज्ञा तंतोतंत। करीन पालन। देती आश्वासन। ते स्वामींस।।२५२।। पुंडलीकराव। म्हणती स्वामींना।

श्रीफळ साईंना। मी देईन।।२५३।। तुमच्या आज्ञेचे। करता पालन। स्वतःला मी धन्य। समजेन।।२५४।। स्वामींना जाऊन। अनन्य शरण। मंडळी तेथून। परतली।।२५५।। स्वामी ते बाबांना। बंधू म्हणायचे। समजावयाचे। हे व्यर्थ का?।।२५६।।

**'यावज्जीवमग्निहोत्रं'**

(जिवंत असेपर्यंत अग्निहोत्र; म्हणजे सकाळ, संध्याकाळ अग्नीत आहुती देऊन तो सतत राखण्याचे व्रत करीत असावे.)

हे श्रुतीवचन। गुरू साईनाथ। नित्य आचरित। भक्तिभावे।।२५७।। बसून सतत। आपुल्या तंद्रीत। त्यांचे अग्निहोत्र। चालू होते।।२५८।। धुनी या नावाने। त्यांचे अग्निहोत्र। पुढे प्रचलित। जनी झाले।।२५९।। अहोरात्र धुनी। राहावी जागृत। हेच होते व्रत। समर्थांचे।।२६०।। चित्तशुद्धीसाठी। बाबांचे हे कर्म। पाळती स्वधर्म। लोकहितार्थ।।२६१।। वासुदेवानंद। जसे होते यती। तसेच ते व्रती। फार मोठे।।२६२।। म्हणून साईंना। बंधू ते म्हणती। भेट पाठविती। श्रीफळाची।।२६३।। पुढे काळ जाता।एक महिन्याचा।दिवस भाग्याचा।उजाडला।।२६४।। पुंडलीकराव। आणि त्यांचे मित्र। ठरवती बेत। शिर्डीचा।।२६५।। घेतले साहित्य। फळफळावळ। आणखी नारळ। स्वामीजींचा।।२६६।। मोठ्या उत्साहात। निघाली मंडळी। मनमाडी आली। स्टेशनावर।।२६७।। खूप वेळ होता। गाडी येण्यासाठी। तेणे ओढ्याकाठी। सारे गेले।।२६८।। उपाशी असता। पोटी घेता पाणी। शरीराची हानी। ती होईल।।२६९।। म्हणून एकाने। चिवडा काढला। तोंडात टाकला। मूठभर।।२७०।। चिवडा खाताच। तिखट लागला। प्रस्ताव मांडला। काय पहा।।२७१।। खोबऱ्याशिवाय। सारी खटपट। ठरेल हो व्यर्थ। न्याहारीची।।२७२।। तेव्हा एकजण। म्हणाला त्वरित। विचार मनात। माझ्या एक।।२७३।। फोडून नारळ। घालू चिवड्यात। होईल चविष्ट। मग नाष्टा।।२७४।। नारळ म्हणता। नारळ काढिला। लगेच फोडला। तो एकाने।।२७५।। चिवड्यात मग। खोबरे टाकले। आणि त्याला केले। खाली-वर।।२७६।। मग आनंदाने। चिवडा खाऊनि। सर्वजण पाणी। त्यावरी प्यायले।।२७७।। पण हा नारळ। असेल कुणाचा। विचार न याचा। कोणी केला।।२७८।। भुकेने इतका। कहर मांडला। विसर पडला। नारळाचा।।२७९।। पुढे सारेजण। स्टेशनात आले। गाडीत बसले। शांतपणे।।२८०।।

कोपरगावच्या। गाडीत बसले। आणखी निघाले। प्रवासास।।२८१।। पुंडलीकराव। बसता गाडीत। झाले विचलित। अचानक।।२८२।। स्वामींचा नारळ। त्यांना आठवला। मिसळला गेला। जो चिवड्यात।।२८३।। शिर्डी जवळ। जशी जशी आली। मनाची वाढली। तळमळ।।२८४।। स्वामींचा नारळ। फुटला चुकून। गेले घाबरून। सारेजण।।२८५।। हातून घडली। फार मोठी चूक। मनी याचे दुःख। फार झाले।।२८६।। संतापून मग। मनासी म्हणाले। पाप मी जोडले। हे केवढे।।२८७।। घडले हातून। फार मोठे पाप। माथी आता शाप। स्वामींचा तो।।२८८।। स्वामींच्या आज्ञेचे। करीन पालन। असे आश्वासन। दिले होते।।२८९।। बोलणे ते माझे। पोकळ ठरले। पातक घडले। फार मोठे।।२९०।। झाली अशी ही। श्रीफळाची गत। आणि फसगत। माझी मोठी।।२९१।। आता काय बरे। साईनाथां देऊ। कैसे समजावू। त्यांना आता।।२९२।। साईपदीं ज्यांचे। समर्पण होते। तेच खाल्ले होते। न्याहरीत।।२९३।। पुंडलीकराव। विचार करून। झाले होते खिन्न। फार मनी।।२९४।। हा तर संतांचा। अपमान झाला। दोष त्याचा मला। लागणार।।२९५।। बाबांचे जेव्हा मी। घेईन दर्शन। घेतील मागून। तो नारळ।।२९६।। तेव्हा काय त्यांसी। देऊ मी उत्तर। मान घालणार। फक्त खाली।।२९७।। नारळ नाही। मजपाशी तो आता। लाज सांगता। ती वाटेल।।२९८।। असत्य बोलून। नाही चालणार। फशी पडणार। आणखीन।।२९९।। सर्वसाक्षी असा। गुरु साईनाथ। तिथे ना गुपित। टिकणार।।३००।। पुढे सारेजण। येता शिर्डीत। गेले मशिदीत। दर्शनास।।३०१।। समर्थ साईंचे। घेताच दर्शन। प्रसन्नवदन। सारे झाले।।३०२।। मनोहर ध्यान। दिसता समोर। आनंदनिर्भर। मनी झाले।।३०३।। अहोरात्र इथे। येतात संदेश। यंत्रणा विशेष। बिनतारी।।३०४।। बिनतारी अशा। यंत्रणेकरिता। पैसे लागतात। भरपूर।।३०५।। परंतु संतांची। वेगळी यंत्रणा। खर्चती न आणा। त्याकरिता।।३०६।। मनाच्या तारेने। काम करतात। निरोप देतात। एकमेकां।।३०७।। स्वामींनी नारळ। जसा त्यांना दिला। निरोप मिळाला। तो साईंना।।३०८।। पुंडलीकराव। घेताच दर्शन। माझी वस्तू आण। साई वदे।।३०९।। बंधूंच्याकडून। वस्तू जी घेतली। नाही का आणली। बरोबर।।३१०।। पुंडलीकराव। ऐकता ते बोल। मनोमनी खोल। झाले फार खिन्न।।३११।। धरले बाबांचे। त्यांनी दोन्ही पाय। हाच तो उपाय।

अखेरचा ।।३१२।। चुकलो देवा मी। क्षमा मज करा। उपाय दुसरा। नाही आता ।।३१३।। नारळाची मज। आठवण होती। पडलो संकटी। भूकेपोटी ।।३१४।। आम्ही जेव्हा गेलो। ओढीयावरती। पडली विस्मृती। नारळाची ।।३१५।। तेथेचि चिवड्याचा। करता फराळ। हाच की नारळ। मिसळला ।।३१६।। म्हणूनि आणितो। दुसरे श्रीफळ। स्वीकारा निश्चल। मानसे तो ।।३१७।। पुंडलीकराव। एवढे बोलून। उठती तेथून। जाण्यासाठी ।।३१८।। पुंडलीकराव। उठता तेथून। घेती थांबवून। साईनाथ ।।३१९।। पुंडलीकराव। त्यावरी म्हणाले। पातक घडले। हे हातून ।।३२०।। फसवणूक मी। महंतांची केली। घोडचूक झाली। ही हातून ।।३२१।। कृपाळू आपण। पदरात घ्यावे। मला सांभाळावे। देवा आता ।।३२२।। स्वामीसम जरी। सज्जन भेटले। वचन मोडले। मूर्खपणाने ।।३२३।। श्रीफळ स्वामींचे। तुम्हास देईन। असे आश्वासन। दिले होते ।।३२४।। स्वामींचे वचन। परि मी मोडले। त्यांना दुखावले। या कर्माने ।।३२५।। पापमुक्त होण्या। उपाय सुचवा। मजला वाचवा। साईनाथा ।।३२६।। हकीकत त्याची। पडताच कानी। वदले हसूनि। साईनाथ ।।३२७।। तुम्ही माझी वस्तू। द्याल मजप्रत। स्वामींच्या मनात। हीच इच्छा ।।३२८।। म्हणूनि बंधूंनी। विश्वास ठेविला। परिणाम झाला। त्याचा असा ।।३२९।। हेच फळ तुम्ही। चिवड्यातून खाल्ले। विपरीत केले। असे कसे ।।३३०।। कामना बंधूंची। नाही पुरवली। करणी ही केली। विपरीत ।।३३१।। आणिक दुसरे। आणता श्रीफळ। ते कवडीमोल। तयापुढे ।।३३२।। घडावयाचे ते। गेले की घडून। नका होऊ खिन्न। त्याच्यासाठी ।।३३३।। स्वामींनी दिला जो। तुम्हास नारळ। इच्छा ती केवळ। माझी होती ।।३३४।। आणखी नारळ। फुटावा मध्येच। तीसुद्धा माझीच। इच्छा होती ।।३३५।। कर्तेपणा याचा। घेतोस कशाला। प्रकार घडला। माझ्यामुळे ।।३३६।। अहंकारी अशी। बुद्धी धरतोस। मानून घेतोस। अपराधी ।।३३७।। कर्तेपण जर। सोडून देशील। सगळा संपेल। त्रास तुझा ।।३३८।। पुण्याचा जसा तो। अभिमान हवा। तसा का नसावा। पापाचाही ।।३३९।। दोघांचा प्रताप। सारखा म्हणून। कर्तव्य सोडून। दे दोघांचे ।।३४०।। तुला भेटण्याची। मला इच्छा झाली। म्हणून घडली। ही कहाणी ।।३४१।। म्हणून नारळ। पडला ओटीत। आणखी वाटेत। तो फुटला ।।३४२।। तुम्ही तर मुले। माझीच आहात। भलते मनात। आणू नका ।।३४३।। तुमच्या मुखात। फळ जेव्हा गेले। तेव्हाच मिळाले। ते मजला ।।३४४।। बाबांनी काढता। ऐशी समजूत। जाहले निश्चिंत। सारेजण ।।३४५।। पुंडलीकराव। मग शांत झाले। विसरून गेले। दुःख सारे ।।३४६।। नारळ गेला हे। केवळ निमित्त। पण आता शांत। मन झाले ।।३४७।। वृथा अहंकारे। ग्रासलेले भक्त। अभिमानमुक्त। आता झाले ।।३४८।। एवढेच आहे। या कथेचे सार। संतांचा विचार। तो मानावा ।।३४९।। सोडली जयाने। अहंकारवृत्ती। तया होई प्राप्ती। परमार्थाची ।।३५०।। तिसऱ्या भक्ताची। कथा अभिनव। दाखवी वैभव। ती बाबांचे ।।३५१।। बांद्रे नामे एका। शहराशेजारी। सुंदर नगरी। सांताक्रूझ ।।३५२।। सांताक्रूझ नामे। प्रसिद्ध गावात। होते हरिभक्त। धुरंधर ।।३५३।। सर्व बंधू त्यांचे। मोठे संतप्रेमी। जयांची श्री रामी। मोठी निष्ठा ।।३५४।। दृढ श्रद्धा त्यांची। होती रामनामी। कधी ना रिकामी। उठाठेव ।।३५५।। स्वच्छ व सरळ। संसारसरणी। तशीच राहणी। ती मुलांची ।।३५६।। स्त्रियासुद्धा त्यांच्या। शुद्ध आचरणी। तेणे चक्रपाणी। ऋणी त्यांचे ।।३५७।। त्या बंधूंमधील। एक बाळाराम। भक्त जो परम। विठ्ठलाचा ।।३५८।। राजदरबारी। जयाचा लौकिक। आवडता देख। सकळांचा ।।३५९।। तारीख तेव्हाची। होती एकोणीस। फेब्रुवारी मास। जन्मवेळी ।।३६०।। सन अठराशे। अठ्ठ्याहत्तरचा। जन्म बालकाचा। झाला होता ।।३६१।। पाठारे प्रभू या। जातीचे भूषण। असे पुत्ररत्न। जन्मा आले ।।३६२।। पाश्चात्य विद्येत। मोठे पारंगत। विद्याविभूषित। ॲडव्होकेट ।।३६३।। तत्त्वज्ञानामाजी। अत्यंत निष्णांत। विद्वान विख्यात। चहूकडे ।।३६४।। पांडुरंगी ज्यांचे। होते अतिप्रेम। आवड परम। परमार्थाची ।।३६५।। आराध्य दैवत। वडिलांचे राम। त्यांच्या मनी प्रेम। विठ्ठलाचे ।।३६६।। अवघी भावंडे। पदवीधारक। परमार्थी सुख। मानणारे ।।३६७।। शुद्ध बीजापोटी। जसा शुद्ध वृक्ष। घडले अचूक। तसे इथे ।।३६८।। बाळारामांवर। संस्कार चांगले। म्हणून ते झाले। परमार्थी ।।३६९।। युक्तिवाद त्यांचा। मोठा आकर्षक। मांडणी सुरेख। बोलण्याची ।।३७०।। विचारसरणी। अत्यंत सरळ। कामात कुशल। ते अत्यंत ।।३७१।। समाजसेवेचे। होते त्यांचे व्रत। पुढे परमार्थ। मार्गी आले ।।३७२।। बऱ्याच प्रांतांत। भ्रमण करून। ग्रंथांचे वाचन। खूप केले ।।३७३।। गीता,

ज्ञानेश्वरी। नाथ भागवत। नित्य वाचनात। त्यांच्या होते ।।३७४।। अध्यात्ममार्गात। खूप नावाजले। त्यात संपादिले। प्रावीण्यही ।।३७५।। असे हे साईंचे। फार मोठे भक्त। झाले ब्रह्मीभूत। अल्पवयात ।।३७६।। त्यांचे लहानसे। चरित्र ऐकावे। श्रोत्यांनी घालावे। लक्ष त्यात ।।३७७।। पंचवीस साली। यात्रा संपवून। विठ्ठलविलीन। ते जाहले ।।३७८।। नऊ माहे जून। पंचवीस सन। भूमीस अर्पण। केला देह ।।३७९।। जून महिन्यात। पंचवीस साली। यात्रा संपविली। भूलोकीची ।।३८०।। एकोणीसशेच्या। बारा सालातला। दिवस पाहिला। एक बरा ।।३८१।। संतदर्शनाचा। साईदरबारा। बंधू धुरंधरा। योग आला ।।३८२।। सहा मास आधी। बंधू बाबुलजी। साईभेटीमाजी। आले होते ।।३८३।। वामनरावांना। घेऊन संगती। साईभेटीसाठी। शिर्डी गावी ।।३८४।। दर्शन घेताच। साईसमर्थांचे। मन शांत त्यांचे। झाले होते ।।३८५।। ज्येष्ठ बंधूंचा हा। गोड अनुभव। पाहण्यास सर्व। ते आतुर ।।३८६।। मंडळी शिर्डीत। येण्याआधी देख। चालले कौतुक। शिर्डीमध्ये ।।३८७।। आज माझे भक्त। येणार आहेत। अवघ्यांदेखत। साई वदे ।।३८८।। धुरंधर जसे। शिर्डीस निघाले। साईंनी जाणले। अंतर्ज्ञाने ।।३८९।। धुरंधर बंधू। येणार म्हणून। तयारीत पूर्ण। साई होते ।।३९०।। धुरंधरांना हे। कळताच वृत्त। आश्चर्यचकित। मनी झाले ।।३९१।। माहीत नसता। कुणालाही काही। कसे काय साई। हे जाणती ।।३९२।। दर्शनास जसे। मशिदीत आले। धावत सुटले। साईंकडे ।।३९३।। मनोहर ध्यान। पडताच दृष्टी। पायीं घट्ट मिठी। ते घालती ।।३९४।। हळुहळू मग। सुरू झाल्या गोष्टी। मंडळी ऐकती। शांत चित्ते ।।३९५।। सुखी–समाधानी। मंडळी जाहली। पाहत बसली। साईंकडे ।।३९६।। तोच साईमुखी। शब्द उमटले। मानकरी आले। दरबारचे ।।३९७।। तुमची–आमची। ओळख पूर्वीची। कित्येक पिढ्यांची। फार जुनी ।।३९८।। बाळारामांसह। सर्व बंधूजन। विनयसंपन्न। असे होते ।।३९९।। पूर्ण भक्तिभावे। बाबांच्या समोर। जोडुनिया कर। उभे होते ।।४००।। समर्थ साईंचे। घडता दर्शन। आनंदसंपन्न। बाळाराम ।।४०१।। दर्शन घेताच। चित्त शुद्ध झाले। सार्थक वाटले। या यात्रेचे ।।४०२।। झाले अश्रुपूर्ण। बाळांचे नयन। स्वानंद जीवन। ओसंडले ।।४०३।। मनोविकाराचा। अतिरेक झाला। आणिक दाटला। कंठ त्यांचा ।।४०४।। बाळारामांची ही। पाहून अवस्था। वदती समस्ता। साईनाथ ।।४०५।। शुक्ल पक्षाचिया। वाढणाऱ्या कला। भजे जो मजला। तेणेपरी ।।४०६।। काम, क्रोध आदी। भावना त्यागेल। शरण येईल। जो मजला ।।४०७।। असा भक्त जेव्हा। मजला भेटतो। आनंद वाटतो। फार मला ।।४०८।। गुरुपदीं ज्याचा। अढळ विश्वास। त्यास नसे भय। कुठलेच ।।४०९।। गुरुभजनाची। धरून आवडी। वाया न दवडी। अर्ध घडी ।।४१०।। तया ते देतील। अमर्याद सुख। ठेवा अमोलिक। परमार्थाचा ।।४११।। भवपैलतिरी। घेऊन जातील। मुक्त करतील। संसारातून ।।४१२।। बाबांचे बोलणे। जसे हे ऐकले। सद्गदित झाले। सारेजण ।।४१३।। सर्वांच्या डोळ्यांत। आनंदाश्रू आले। समाधानी झाले। सारेजण ।।४१४।। पुन्हा साईपदीं। करिता वंदन। आनंदसंपन्न। सारेजण ।।४१५।। साईवाक्रूपी। सुमनमाळा ती। गळ्यात घालती। सारेजण ।।४१६।। तेणे मनी झाला। आनंद सकळां। कारण उमाळा। हा भक्तीचा ।।४१७।। पुढे सारेजण। वाड्यावर गेले। थोडे विसावले। भोजनोत्तर ।।४१८।। तिसऱ्या प्रहरी। मशिदीत आले। साईपदीं झाले। पुन्हा नम्र ।।४१९।। बाळाराम मग। वंदन करूनि। बैसती चरणीं। सेवेसाठी ।।४२०।। बाबांनी चिलीम। हातात देऊन। केली त्यांना खूण। ओढावया ।।४२१।। बाळाराम मग। चिलीम ओढती। प्रसाद मानती। तो साईंचा ।।४२२।। सवय नसता। कष्टे ती ओढली। पुन्हा हाती दिली। ती साईंच्या ।।४२३।। पुनश्च बाबांचे। धरून चरण। करती वंदन। मनोभावे ।।४२४।। बाळारामांस तो। दिवस भाग्याचा। मोठ्या आनंदाचा। की ठरला ।।४२५।। दम्याचे दुखणे। लगेच पळाले। व्याधीमुक्त झाले। बाळाराम ।।४२६।। दमा तोही होता। अत्यंत जुनाट। झाले आता मुक्त। त्यापासून ।।४२७।। कानमंत्र द्यावा। गुरुने शिष्याला। प्रकार घडला। हा तसाच ।।४२८।। चिलमीचा एक। झुरका मारला। प्रभाव पडला। त्याचा असा ।।४२९।। त्या दिवसापासून। दमा जो संपला। पुन्हा नाही आला। कधीसुद्धा ।।४३०।। पण एके दिनी। खोकला वाढला। त्रास सुरू झाला। पुन्हा त्यांना ।।४३१।। चौकशी करता। वृत्तांत कळला। बाबांनी ठेविला। देह तेव्हा ।।४३२।। बाळारामांस त्या। ठसका आणून। जणू आठवण। त्यांना केली ।।४३३।। जणू ही सूचना। भक्तास देऊन। देहास सोडून। बाबा गेले ।।४३४।। तेव्हापासून ते। व्याधीमुक्त झाले। पूर्ण बरे झाले। कायमचे ।।४३५।। असो पुढे मग।

गुरुवार आला। समारंभ आला। चावडीचा।।४३६।। धुरंधर बंधू। सोहळा पाहती। आनंदित होती। आणखीन।।४३७।। आठ ते नऊ ही। वेळ भजनाची। गजर करती। वाद्ये तिथे।।४३८।। एकीकडे पहा। अभंग म्हणती। आनंदे नाचती। अंगणात।।४३९।। कोणी पालखीला। छान सजवती। कोणी वाजवती। झांज - टाळ।।४४०।। सदतिसाव्या हे। अध्यायी वर्णिले। कसा काय चाले। सोहळा तो।।४४१।। म्हणून वर्णन। थोडक्यात केले। जसे आठवले। तसे-तसे।।४४२।। एका रात्री साई। असती मशिदीत। दुजी चावडीत। ते काढीत।।४४३।। बाबांचा हा नेम। चाले अखंडित। जोवरी कुडीत। होता प्राण।।४४४।। पालखीसोहळा। दिसावा म्हणून। खेड्यापाड्यातून। येती भक्त।।४४५।। बाळारामांसही। तीच इच्छा झाली। म्हणून मंडळी। तिथे आली।।४४६।। धुरंधर बंधू। चावडीत आले। पाहत बसले। तो सोहळा।।४४७।। स्त्री - पुरुष दोघे। भजन करती। प्रेमाने चालती। रांगेतून।।४४८।। मग साईनामे। जयजयकार। थयथयकार। तो घोड्याचा।।४४९।। आघाडीस घोडा। होता ताम्रवर्ण। ज्याचे श्यामकर्ण। नाव होते।।४५०।। झणत्कारित ती। घुंगुरे पायांतील। घोडा चावडीकडील। वाट चाले।।४५१।। कोणी शिंगेकर्णे। तुताऱ्या फुंकती। झांज वाजवती। कोणी तास।।४५२।। दिंडी - पताकांची। तिथे दाटीवाटी। ध्वज मिरवती। गरुडाचे।।४५३।। कोणी निशाणास। घेऊन हातात। नाचत-नाचत। पुढे जाती।।४५४।। दोन्ही बाजूंस। चवऱ्या ढाळती। पंख्यांनी घालती। कोणी वारा।।४५५।। झांज, टाळ, वीणा। मृदुंग, चिपळी। जमती मंडळी। भजनास।।४५६।। माथ्यावरी धरे। छत्रधारी छत्र। चवऱ्या ढाळीत। चवऱ्यावाले।।४५७।। भक्तांचा हा मेळा। वाजत-गाजत। येऊन चौकात। उभा ठाके।।४५८।। भक्तसमुदाय। दोन्ही बाजूंस। करती प्रवास। स्वानंदात।।४५९।। मग एका जागी। थांबे साईनाथ। आणि करे हात। वर-खाली।।४६०।। उत्तर दिशेला। होऊन सन्मुख। ही क्रिया अचूक। साई करे।।४६१।। तात्याबा पाटील। डावा हात धरती। उजवा तो धरती। म्हाळसापती।।४६२।। म्हाळसाभगत। उजव्या बाजूस। धरती कफनीस। उचलून।।४६३।। डाव्या हाती तात्या। धरून कंदील। टाकती पाऊल। हळुहळू।।४६४।। साईमुखी तेज। तांबूस गव्हाळ। पाहता सकळ। उल्हसित।।४६५।। उगवता सूर्य। असे दिसे मुख। करावे कौतुक। किती त्याचे।।४६६।। दर्शन घडता। अशा समयीचे। ठरेल भाग्याचे। ते लक्षण।।४६७।। उत्तर दिशेस। एकटक दृष्टी। जणू बोलावती। ते कोणास।।४६८।। तात्याबा प्रेमाने। बाबांस धरून। आसन घालून। बसवीत।।४६९।। दिव्य छान वस्त्रे। अंगी चढवती। आणखी करती। पूजाकर्म।।४७०।। उंची अत्तराचे। फाये बनविती। अंगास माखती। ते साईंच्या।।४७१।। भरजरी वस्त्रे। घालून अंगात। ठेवती मुकुट। त्यांच्या शिरी।।४७२।। कधी सुवर्णाचा। साजिरा मुकुट। कधी शोभिवंत। पागोटाही।।४७३।। गळ्यात माणके। हिरे चमकती। वरती घालती। मोतीहार।।४७४।। सुगंधी कस्तुरी। हाती उगाळती। आणखी लावती। भाळी त्यांच्या।।४७५।। वैष्णवपंथीय। काळा गोल टिळा। लावती कपाळा। त्यांच्या कोणी।।४७६।। बापू जोग मग। धुऊन चरण। करती पूजन। विधिपूर्वक।।४७७।। मग भक्तगण। आरती करती। भावे ओवाळती। ते बाबांस।।४७८।। मग प्रेमभावे। बाबांच्या हाती। विडाही ठेवती। आदराने।।४७९।। पंढरीत जशी। विठ्ठलाची मूर्ती। तसेच भासती। साईनाथ।।४८०।। पालखीसोहळा। बाबांचा पाहून। जाती भारावून। धुरंधर।।४८१।। वीज चमकता। ती नभोमंडळी। न लक्षे भूतली। ती कोणास।।४८२।। तेच दिव्य तेज। समोर दिसले। नयन दिपले। त्या तेजाने।।४८३।। पुढे धुरंधर। शिर्डीत रमले। फार मोठे झाले। साईभक्त।।४८४।। साईचरणांशी। हेमाड शरण। आता ग्रंथ पूर्ण। होत आला।।४८५।। सिंह जसा पाहे। मागे वारंवार। तशीच नजर। तुम्ही ठेवा।।४८६।। मागील कथन। परत वाचावे। मनन करावे। सदोदित।।४८७।। संतकृपांकित। श्रेष्ठ असा ग्रंथ। रचयिता भक्त। हेमाडपंत।।४८८।। तीन अतिश्रेष्ठ। भक्तांचे वर्णन। पवित्र कथन। या अध्यायी।।४८९।। समर्थ साईंचे। अभंग चरित्र। अध्याय समाप्त। आता होई।।४९०।। साईच लिहिती। अभंग चरित्र। सतईश फक्त। निमित्तास।।४९१।।

।। इति श्री साईभक्त सतईश विरचित 'अभंग श्री साईसच्चरित'।।

।। अध्याय एक्कावन्नावा समाप्त।।

।। श्री सद्गुरु साईनाथार्पणमस्तु।। शुभं भवतु।।

- रचना : **सतीश काळे**
फ्लॅट नं. २०, हरिप्रसाद अपार्टमेंट,
विश्रांती नगर, सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे - ४११ ०५१.
भ्रमणध्वनी : (०)९८९०६१७३६१

# साईअनुभव

## साईसान्निध्यातील भक्तांची पुढील पिढीही साईकृपांकित

''तुम्हें बेटा होगा। उसका नाम 'राम' रखना।'' असा आशीर्वाद ज्यांना साईबाबांनी दिला ते ''आरती साईबाबा...'' या आरतीचे रचयिता कै. माधवराव वामनराव अडकर हे शिर्डीत प्रथम गेले ते १८९७ मध्ये. ते एक पुण्यपुरुष होते. त्यांची साईबाबांवरील आरती साईदेहावतारापासूनच विलक्षण प्रचीती देत असल्याचे आपल्याला श्री साईसच्चरिताच्या ३३व्या अध्यायात वाचावयास मिळते. साईमंदिरांतून ती नित्य म्हटले जाते; कित्येकांना ती मुखोद्गत आहे. जगाच्या अंतापर्यंत तिचे अस्तित्व व प्रभाव वेळोवेळी दिसून येणार आहे. या प्रासादिक आरतीने माधवरावांना साईविश्वात अजरामर करून ठेवले आहे.

प्रथम दर्शनभेटीतच ते बाबांचे होऊन गेले. नंतर मनात आले की ते शिर्डीस जात आणि बराच काळ तेथे मुक्काम करीत असत. अशाच एका मुक्कामाच्या वेळी इ. स. १९०३-०४च्या सुमारास माधवरावांकडून लिहिली गेलेली ''आरती साईबाबा...'' ही आरती ऐकून बाबा त्यांना म्हणाले होते, ''ही तुझी आरती भक्तांचं संकट निवारील बरं! लई कोटकल्याण करील.''

माधवराव शिर्डीत असताना त्यांच्या घरची मंडळी त्यांना शोधत असल्याचे बाबांनी अंतर्ज्ञानाने जाणले आणि माधवरावांना, त्यांना घेऊन जाण्यासाठी आलेल्या मंडळींसोबत जाण्यास सांगितले. त्यांची रवानगी करताना बाबा त्यांना म्हणाले होते, ''जाओ, चले जावो! तुम्हें बेटा होगा। उसका नाम 'राम' रखना। यहाँ नहीं ठहरना। चले जाव।'' बाबांच्या या आदेशानुसार माधवराव घरी परतले... आणि बाबांच्या आशीर्वादाने ४ मार्च १९१५ रोजी जन्म



## बाबांच्या 'राम'चे शंभरीत पदार्पण

झालेल्या मुलाचे नाव त्यांनी बाबांनी सुचविल्याप्रमाणे 'रामचंद्र' ठेवले. रामचंद्र अडीच वर्षांचे असताना त्यांना शिर्डीत नेऊन बाबांच्या मांडीवर बसविण्यात आले होते. वडिलांमुळे त्यांना शिर्डीस जाण्याचा व मुक्काम करण्याचा योग येत असे.

गेल्या ४ मार्च २०१४ रोजी रामचंद्रांना वयाची ९९ वर्षे पूर्ण होऊन त्यांनी शंभरीत पदार्पण केले आहे. त्यानिमित्ताने त्यांचे सुपुत्र सर्वश्री जनार्दन व अरुण यांनी श्री बाबांच्या रामचंद्रांचा जन्मशताब्दी सोहळा दिनांक १३ एप्रिल २०१४ रोजी पुणे येथील एका सभागृहात मोठ्या थाटामाटात आयोजित केला होता. सोहळ्यांतर्गत श्री. रामचंद्र व त्यांची पत्नी सौ. मथुराबाई यांची गूळ-पेढ्यांनी तुला करण्यात आली. श्री साईंचे प्रत्यक्ष दर्शन झालेल्या श्री. रामचंद्रांचा हा हृद्य सोहळा, पुणे-मुंबई-दिल्ली आदी ठिकाणच्या आमंत्रित केलेल्या बऱ्याच साईभक्तांनी, याचि देही - याचि डोळा पाहून साईंच्या निरंतर प्रचीतीचा एक आगळा अनुभव म्हणून स्मृतीत कायमस्वरूपी संकलित केला.

श्री रामचंद्र यांची मुले, नातवंडे, नातसुना सर्वजण उच्चविद्याविभूषित असून, इंजिनीयर, वकील, डॉक्टर, प्राध्यापक, सरकारी अधिकारी व व्यावसायिक म्हणून कार्यरत आहेत. श्री साईबाबांचीच ही कृपा असल्याचे श्री. रामचंद्र आवर्जून सांगतात. तसे त्यांना वेळोवेळी अनुभवही आलेले आहेत.

संदर्भ : सौ. मुग्धा सुधीर दिवाडकर लिखित 'साईंच्या सान्निध्यात' व 'अडकर वंशावळी'

संकलन :

**सौ. अंजली विजयकुमार प्रधान-दाभोलकर**

OOO

**राव असो वा रंक। समसाम्य सकळां निष्टंक। लक्ष्मीपुत्र वा भिकारी खंक। उभयांसी एकचि माप तेथें।।**

**- श्री साईसच्चरित**

श्री साईबाबांनी 'हेमाडपंत' या नावाने ज्यांना गौरविले ते माझे आजोबा कै. गोविंद रघुनाथ दाभोलकर यांनी श्री साईबाबांच्या आशीर्वादाने लिहिलेली श्री साईसच्चरित ही पोथी मी प्रथम वाचली ती माझ्या वयाच्या साधारण पंधराव्या वर्षी. माध्यमिक शालांत शिक्षण पूर्ण होऊन नुकतीच सुट्टी लागली होती. याच वयात जीवनाला योग्य दिशा मिळायला हवी असते, हे जाणून इतर बाबींत वेळ घालविण्यापेक्षा जीवनमार्गावर अनमोल मार्गदर्शन करणारे श्री साईसच्चरित आपल्या लेकीने वाचावे, असे माझ्या आईला वाटले. तिची आज्ञा शिरसावंद्य मानून मी श्री साईसच्चरित वाचायला सुरुवात केली. कळायला काहीसे अवघड जात होते. तरीही वाचन चालूच ठेवले. नेटाने वाचत राहिले. अध्याय ७ वाचायला घेतला आणि मला आश्चर्यच वाटू लागले. जे आपल्याला समोर, आजूबाजूला असू नयेत, दिसू नयेत असे वाटते; दिसलेच, समोर आलेच, तर दृष्टी फिरवून, चार हात लांब होऊन आपण निघून जातो अशापैकी एका महारोग्याकडून, भागोजी शिंदेकडून बाबा आपली सेवा कशी करून घेत असत, याचे नवल वाटले. त्यानंतर अनेकदा श्री साईसच्चरिताचे वाचन झाले. प्रत्येक वाचनानंतर सर्वसाधारण समाज ज्यांच्याशी दुरावा ठेवतं अशांना आपलं करणारं साईबाबांसारखं कोणी आपल्याला प्रत्यक्ष पाहायला मिळेल का, याची उत्सुकता लागून राहायची... आणि ती माझी इच्छा साईबाबांनी २०१४च्या जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात पूर्ण केली. दिनांक २५ जानेवारी २०१४ला कै. बाबासाहेब आमटे यांचा भव्य-दिव्य विशाल आनंदाश्रम पाहण्याचा योग आला. एक अनोखे जग पाहत असल्याचा तेथे अनुभव आला. तेथील स्वच्छता, महारोग्यांचे प्रेम, कळवळा, त्यांनी बांधलेली ७ सरोवरे, कै. बाबासाहेबांची समाधी, फुलझाडे, बागा, महारोग्यांची कष्ट करण्याची जिद्द, त्यांना कै. बाबासाहेबांप्रमाणेच आपलेसे केलेले त्यांचे चिरंजीव डॉ. विकासभाऊ, कामतकाका, प्रभूकाका यांनी मन:पूर्वक केलेले आदरातिथ्य... हे सारे पाहून मी पुरती भारावून गेले. मायेचा खरा अर्थ इथे मला कळून आला...

**काय बाबांचे चमत्कार। किती म्हणून मी वर्णूं पामर। देवा-देऊळांचेही जीर्णोद्धार। बाबांनी अपार करविले।।**

**- श्री साईसच्चरित**

माझे भाग्य असे की, येथून जवळच वर्धा रोड (नागपूर) येथील श्री साईमंदिरात मला जाता आले.



तेथे शिर्डी येथील साईसमाधिमंदिर ज्यांनी बांधले त्या कै. गोपाळराव बुट्टी यांचे नातू सुभाषभाऊ व त्यांची सुविद्य पत्नी सौ. कल्याणीताई यांच्या प्रथमच भेटीचा, त्यांच्यासोबत राहण्याचा, गप्पागोष्टी करण्याचा योग जुळून आला.

सुभाषभाऊंनी तेथील ज्येष्ठ साईभक्त बाबासाहेब उत्तरवार यांची ओळख करून दिली. त्यांनी आपल्या वयाची ८८ वर्षे पूर्ण केली आहेत. त्यांच्याकडून साईबाबांनी वर्धा रोड येथील मंदिर कसे बांधून घेतले, याची त्यांनी सविस्तर माहिती दिली. वयोवृद्ध असूनही आपल्या स्मरणातील इतिहासाची पाने ते सहज उलगडवून दाखवत होते. एक-एक अनुभव विस्मित करणारा होता...

साईबाबांचे मंदिर बांधण्याचा विचार बाबासाहेब उत्तरवारांच्या मनात आला. तो त्यांनी आपल्या ओळखीतील साईभक्तांकडे व्यक्त केला... आणि या कार्याला अनेक साईभक्तांचा सहभाग मिळू लागला...

त्याच दरम्यान बॅनर्जी नामक एका सद्गृहस्थाला आपला १०० x २०० फुटांचा प्लॉट ४५,०००/- रुपयांना विकायचा असल्याचे कळले. तो प्लॉट विकत घेण्याचे आम्ही ठरविले.

साकोरीच्या सती गोदावरीमाता व त्यांच्या कन्या, सिनेअभिनेता दिलीपकुमार, श्री. एन्. के. पी. साळवे यांच्या उपस्थितीत विख्यात गायक पं. भीमसेन जोशी, नागपुरातील सिनेव्यावसायिक श्री. केशवराव इंगळे यांच्या सहकार्याने चित्रपट कलावंत धर्मेंद्र व हेमामालिनी यांची उपस्थिती लाभून प्रसिद्ध गायक शैलेंद्र सिंग आदींच्या सांस्कृतिक कार्यक्रमांतून निधी जमा करण्यात आला. शैलेंद्र सिंग यांच्या कार्यक्रमाच्या वेळी मूळ तुमसरच्या मुंबईतील एका ख्यातनाम उद्योगपतीने दीड लाख रुपयांची देणगी दिली.

प्रथम जमलेल्या निधीतून ४५,०००/- रुपये देऊन आम्ही वर उल्लेखित प्लॉट खरेदी केला व मंदिराच्या नावे त्याचे पंजीकरण केले.

एका शुभ मुहूर्तावर महाराष्ट्र राज्याचे त्यावेळचे अर्थमंत्री नागपूरचे श्री. शेषराव वानखेडे यांच्या हस्ते मंदिराचा पाया घातला गेला.

मंदिरनिर्माणकार्याला हळुहळू वेग येऊ लागला. नागपूरचे प्रख्यात आर्किटेक्ट श्री. शिवधनमल यांनी आमच्या विनंतीवरून मंदिराचा नकाशा नि:शुल्क तयार करून दिला.

नागपुरातील कुशल मोटर मेकॅनिक श्री. बाबुलाल बरथे यांनी श्री साईबाबांची मूर्ती दिली. त्यासाठी ते स्वत: आपला ट्रक घेऊन जयपूरला गेले आणि तेथील मार्बल खरेदी करून तो त्यांनी मुंबईला ख्यातनाम शिल्पकार श्री. हरीश तालीम यांच्याकडे सुपूर्द केला. सारा कस पणाला लावून तालीम यांनी श्री साईबाबांची विलोभनीय मूर्ती घडवली.

३ डिसेंबर १९७९ रोजी सती गोदावरीमाता यांच्या हस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा यथाविधी करण्यात आली.

यानिमित्ताने अखिल भारतीय साईभक्त संमेलन आयोजित करण्यात आले होते. देशभरातील विविध ठिकाणच्या सुमारे ६० संस्थांचे पदाधिकारी या संमेलनाला उपस्थित होते.

प्राणप्रतिष्ठेच्या कार्यक्रमात शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थानचे त्यावेळचे कोर्ट रिसिव्हर श्री. क. हि. काकरे, मंदिराचे पुजारी दिगंबरशास्त्री, चोपदार आदींना खास आमंत्रित करण्यात आले होते.

तीन दिवसांच्या या कार्यक्रमात साईभक्तांना साईपादुकांचे दर्शन घडविण्यात आले.

त्यानंतर नागपुरातील साईभक्त ताराचंदजी निमाणे यांनी शिर्डीच्या धर्तीवर प्रतीकात्मक द्वारकामाई निर्माण करण्यासाठी ५०,०००/- रुपयांची देणगी दिली. या द्वारकामाईने मंदिरपरिसराची शोभा वाढविली आहे.

द्वारकामाईत पेटविलेली धुनी अखंड प्रज्ज्वलित आहे. तेथे लावलेल्या कडूलिंबाच्या झाडामुळे आजूबाजूचे वातावरण आल्हाददायी आहे.

आज या मंदिरात दर गुरुवारी सुमारे १० हजार भक्तांना विनामूल्य प्रसादभोजन दिले जाते. नागपुरातील ते एक तीर्थस्थळ बनले आहे. साईबाबांच्याच कृपेने हे सारे घडले आहे, अशी या मंदिरनिर्माणाची हकीकत माहीत असलेल्या भक्तांची नितांत श्रद्धा आहे.

**– सौ. अंजली विजयकुमार प्रधान-दाभोलकर**
ए-९०६, फीलजॉय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी,
हिम्मत नगरच्या मागे, एम्. सी. एफ. पुलाजवळ,
बोरिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०९२.
दूरध्वनी : (०२२)२८९०६२२४

*(पृष्ठ क्र. ६वरून)*

**पृथ्वी सप्तद्वीप नवखंड।**
**सप्तस्वर्ग पाताळ अखंड।**
**यांते प्रसवी जे हिरण्यगर्भांड।**
**तेंचि ब्रह्मांड प्रसिद्ध ।।**
**प्रसवे जी ब्रह्मांडा यया।**
**जी नामे 'अव्यक्त' वा 'माया'।**
**तया मायेचियाही पैल ठाया।**
**सद्गुरुराया निजवसती ।।...**

आता सांगा, या सद्गुरुतत्वाचा ठाव कधीतरी लागेल कां? आपण किती सहज करतो अशी विधानं? ईश्वरी शक्तीपेक्षा आपला विश्वास असतो तो या नाशिवंत प्रकृतीवर, म्हणजेच पर्यायाने स्वतःवर! म्हणूनच, 'सद्गुरुवचनावर पूर्ण विश्वास ठेवून आयुष्याची कालक्रमणा करा,' असं संतांना कळकळीने सांगावं लागतं.

*(क्रमशः)*

अनुबंध प्रकाशनाच्या 'साईंच्या सान्निध्यात' या आगामी पुस्तकातून


**– सौ. मुग्धा सुधीर दिवाडकर**
६१, हिंदू कॉलनी, पहिली गल्ली, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४.
ई-मेल : mugdha54@rediffmail.com
भ्रमणध्वनी : (०)९३२३९७११११७

**('साईंच्या सान्निध्यात' या लेखमालेअंतर्गत प्रसिद्ध होत असलेले लेख, त्यांतील कोणताही भाग, अनुवाद इतरत्र प्रसिद्ध करण्यापूर्वी सदर लेखिकेची अनुमती घेणे अत्यंत आवश्यक आहे. विनाअनुमती तसे केल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर सक्त कारवाई करण्यात येईल.)**

*(पृष्ठ क्र. ११वरून)*

***गीत जैसा मैं हूँ निराश्रित,***
***तुम्हारे सुर बिना,***
***साईं तुम्हारे सुर बिना।***
***प्रीत जैसा मैं हूँ अकेला,***
***तुम्हारे संग बिना साईं,***
***तुम्हारे संग बिना।***
***मन जैसा मैं हूँ खामोश,***
***तुम्हारे स्वप्न बिना साईं,***
***तुम्हारे स्वप्न बिना।***
***भुले जैसा मैं हूँ दिशाहीन,***
***तुम्हारे संकेत बिना साईं,***
***तुम्हारे संकेत बिना।***
***समय जैसा व्यर्थ है जीवन,***
***तुम्हारे भक्ति बिना साईं,***
***तुम्हारे भक्ति बिना।***
***कागज़ के फूल जैसा हूँ मैं,***
***तुम्हारे सुगंध बिना साईं,***
***तुम्हारे सुगंध बिना।***

**– जयंत दत्तात्रय कुलकर्णी**
माजी मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा
अध्यक्ष, त्रि-सदस्यीय समिती,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,
शिर्डी, ता. राहाता, जि. अहमदनगर.



## नित्य घ्या प्रचीत अनुभवें।

(साईभक्त शिवनेसन स्वामीजींच्या प्रेरणेने साईभक्त रामलिंगम स्वामी यांनी लिहिलेल्या 'ॲम्ब्रोशिया इन शिर्डी' या मूळ इंग्रजी पुस्तकातून -)

*(मागील अंकापासून क्रमश:)*

**३२) श्री बाबांनी मिरजेच्या श्री. नित्यानंद पॉल यांचा क्षयरोग बरा केला...**

एकदा श्री. नित्यानंद पॉल आपल्या मित्रासमवेत पुणे येथे गेले होते. त्यांना पुणे येथून वानुरी येथे जायचे होते. प्रवासात अचानक त्यांची बस ब्रेकडाऊन झाली आणि ती दुरुस्त होऊन पुण्याला पोहोचेपर्यंत जवळजवळ दोन तास उशीर झाला. त्यामुळे त्यांची पुढे पुण्याहून वानुरीला जाणारी बस सुटून गेली.

त्यानंतर त्यांच्या मित्राने त्यांना आपल्या आणखी एका ख्रिश्चन मित्राकडे नेले. नंतर त्या दोघांमध्ये श्री साईनाथांच्या लीलांविषयी गप्पा सुरू झाल्या. बाबांच्या अतर्क्य लीला ऐकून पॉल भारावून गेले. त्यांनी आपण एकत्रच शिर्डीला जाऊ या, अशी इच्छा आपल्या मित्राजवळ व्यक्त केली. त्यांच्या मित्राने या कल्पनेचे मनापासून स्वागत केले... आणि ते मित्र-मित्र शिर्डीला पोहोचले.

यापूर्वी सुमारे १५ वर्षांपासून श्री. पॉल यांना क्षयरोगाचा त्रास होता. ते शिर्डीला पोहोचले आणि त्यांचा सर्दी-खोकला प्रचंड वाढला. पण, शिर्डीत दोन-तीन दिवस राहिल्यानंतर तो जवळजवळ नाहीसा झाला. त्यानंतर त्यांचा मित्र परत गेला.

त्यांचा मित्र तिथून निघाल्यानंतर श्री. पॉलना पुन्हा खूप त्रास होऊ लागला. त्यांना कफामधून रक्त पडू लागले. गुजरातमधील डॉ. सुभाष दामोदर यांनी उपचार केल्यानंतर रक्त पडणे बंद झाले.

आत्यंतिक शरणागत अवस्थेत श्री. पॉल समाधिमंदिरात प्रवेश करते झाले. 'बाबा, गेली १५ वर्षे मी क्षयरोगाचा त्रास भोगतो आहे. आता मला हे सहन होत नाही. मला या जीवघेण्या त्रासातून बरे करा. नाही तर या पवित्र शिर्डीतच तुमच्या पायांपाशी मला मरण येऊ द्या!' अत्यंत कळकळीने श्री बाबांना विनंती करून पॉल समाधिमंदिरातून बाहेर पडले.

त्यानंतर एक अत्यंत वृद्ध गृहस्थ पॉल यांच्या निवासस्थानी आला आणि पॉल यांच्या रोगाबद्दल त्याने सविस्तर विचारपूस केली. त्यांनी पॉल यांना सांगितले की, ते जे देतील ते पॉल यांनी खाल्ले, तर त्यांचा आजार कायमचा बरा होईल. पॉल यांनी ते खाण्याला संमती दर्शवली.

औषध घेतल्यानंतर काही काळ उलट्या (वांती) होण्याचा त्रास होईल, असेही त्या वृद्ध माणसाने सांगितले. पॉल यांनी तेही मान्य केले. औषध घेतल्यानंतर एक आठवडाभर पॉल यांना जबरदस्त त्रास झाला आणि नियमित तीन आठवडे औषध घेतल्यानंतर त्यांच्या जीवाला आराम पडला. त्या वृद्ध व्यक्तीने औषधोपचाराच्या बदल्यात काहीही मागितले नव्हते. म्हणून पॉल यांची इच्छा झाली की, त्या वृद्ध व्यक्तीला परत एकदा भेटून धन्यवाद द्यावेत, त्यांची काही फी असली तर द्यावी; परंतु पॉलना तो गृहस्थ पुन्हा कधीच दिसला नाही.

पॉल मनोमन समजले की, ती वृद्ध व्यक्ती म्हणजे

तिच्या रूपात स्वत: श्री साईबाबा होते. सर्वज्ञानी श्री साईबाबांच्या कृपेनेच त्यांचा पंधरा वर्षे त्रास देणारा जुनाट क्षयरोग तीन आठवड्यांत नाहीसा झाला.

**३३) श्री साईनाथांनी शंभूचेट्टी स्ट्रीट, चेन्नई येथील श्री. एस्. एन्. रंगास्वामी यांच्या मोठ्या बहिणीचा कॉलरा आजार बरा केला...**

२४ फेब्रुवारी, १९४०ची गोष्ट. श्री. एस्. एन्. रंगास्वामी यांच्या बहिणीला अचानक कॉलऱ्याचा त्रास सुरू झाला. तिला २५-३० जुलाब झाले आणि सगळ्यांना तिची फार काळजी वाटू लागली.

मध्यरात्री रंगास्वामींनी तिच्या कपाळाला साईबाबांची उदी लावली आणि ती या आजारातून बरी व्हावी म्हणून श्री बाबांची करुणा भाकली. ती बरी झाली, तर शिर्डीला ३/- रुपये पाठवीन, असा नवसही केला. तसे तिचे जुलाब त्वरित थांबले. बोलल्याप्रमाणे श्री. रंगास्वामींनी श्री साईबाबा संस्थान शिर्डीला ३/- रु. पाठवले.

**३४) शिर्डीच्या श्री. मुरलीधर भिका सोनवणे यांच्या लहान मुलीला बाबांनी वाचवले...**

मे १९८२ची गोष्ट. श्री. मुरलीधर भिका सोनवणे यांची अडीच वर्षांची लहान मुलगी रजनी खूप आजारी होती. तिची प्रकृती वैद्यकीय उपचारांना साथ देत नव्हती. तिचं दुखणं वैद्यकीय इलाजांच्या पलीकडे असल्याचं डॉक्टरांनी सांगितलं. तिचे आई-वडील धास्तावले. आणखी एक संधी घेऊन पाहावं म्हणून ते तिला शिर्डी येथील डॉ. गोंदकर यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी तिच्यावर लागलीच उपचार सुरू करून सांगितले की, पुढील सर्व श्री बाबांच्या कृपेवर अवलंबून आहे. थोड्या वेळाने मुलगी बेशुद्ध झाली, तिने डोळे फिरविले. आता मुलगी हाताला लागते की नाही, या भितीने अखेरचा उपाय म्हणून आई-वडिलांनी तिला द्वारकामाईत आणले आणि बाबा बसत असत त्या मोठ्या दगडावर ठेवले.

तिची नाडी मंद होत चालली होती आणि जवळजवळ थांबली म्हणायला हरकत नाही इतकी ती संथ झाली होती. त्यांनी तिला श्री बाबांचे तीर्थ आणि उदी घालून पाणी पाजले; पण सुधारण्याची काही चिन्हे दिसेनात. तिचे आई-वडील अत्यंत जड अंत:करणाने बाबांच्या धुनीपाशी गेले आणि तेथील फोटोसमोर त्यांनी बाबांना प्रार्थना केली की, 'पोरीला आपल्या चरणी वाहिले आहे.' अर्धा तास प्रार्थना करून ते दगडापाशी आले, तर काय, त्यांच्या मुलीचं स्तब्ध शरीर तिथे नव्हतंच. त्यांची मुलगी रजनी द्वारकामाईच्या दक्षिण भिंतीजवळ इतर मुलांबरोबर चक्क खेळत होती. साईप्रभूंच्या असीम कृपेमुळे आपल्या मुलीला असे निरोगी आनंदी बघून आई-वडिलांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

**३५) तिरुपतीच्या श्रीमती मुनिरंगम् नायडू यांना श्री बाबांनी दर्शन दिले...**

१९६४ साली श्रीमती मुनिरंगम् नायडू अत्यंत भक्तिभावाने आपल्या देवघरात बसून परमेश्वराची प्रार्थना करीत होत्या. त्यावेळी अचानक त्यांच्यासमोर एक साधुपुरुष प्रकट झाला. त्याच्या डोक्यावर मोठमोठ्या जटा होत्या. 'मला पाहून तू घाबरलीस का?' असे त्याने विचारल्यावर श्रीमती नायडूंनी 'नाही' असे उत्तर दिले.

नंतर त्याने तोंडावाटे वांती करून आपली आतडी बाहेर काढली आणि थोड्या वेळाने गिळून टाकली. मग त्याने श्रीमती नायडूंना आपल्या रिकाम्या हातातून तीर्थ काढून देऊन त्यांच्याकडे दक्षिणा मागितली. श्रीमती नायडूंनी पैशाचा शोध घ्यायला सुरुवात केली; पण त्यांना ते मिळेनात. तेव्हा त्या साधूने सांगितले की, पैसे त्यांच्या कपाटात अमूक एका ठिकाणी आहेत. श्रीमती नायडू ते शोधायला गेल्या.

त्या परत येईपर्यंत तो महात्मा अदृश्य झाला होता, मागे कोणतीही खूण न ठेवता! नक्कीच ते बाबा होते, जे संतरूपात श्रीमती नायडूंना दर्शन देऊन गेले आणि त्यांचे रक्षण ते स्वत: करीत असल्याचे फार मोठे आश्वासनही!

*(क्रमश:)*

मूळ इंग्रजीतील संकलन, संपादन - **ज्योती रंजन राऊत**
८/ए, काकड इस्टेट, १०६ सी फेस रोड,
वरळी, मुंबई-४०० ०१८.
ई-मेल : **jyotiraut15@rediffmail.com**
मराठी अनुवाद - **सौ. शर्मिला पटवर्धन**
फ्लॅट नं. ५१, अभिजित अपार्टमेंटस्,
७वा मुख्य रस्ता, ११वा आडवा रस्ता,
मल्लेश्वरम्, बंगळुरु - ५६० ००३.
ई-मेल : **sharmila21_phatak@yahoo.co.in**
भ्रमणध्वनी : (०)९८४४०६९४७५

# धन्वंतरी साई

**क**लियुगात अवतरित झालेले श्री साईबाबा यांना कोणी ब्रह्माचा, कोणी विष्णूचा, कोणी शंकराचा, तर आणि कोणी अन्य देवतेचा अवतार मानतात. शेवटी 'जया मनीं जैसा भाव, तया तैसा अनुभव'; म्हणजे ज्यांनी बाबांना ज्या देवाचा अवतार समजून बघितले, पूजले, बाबा त्यांना त्या रूपात दिसले, तसे त्याच्यासमोर प्रकट झाले. हे सारे जरी खरे असले तरी बाबा शिर्डीत सर्वप्रथम प्रकट झाले ते फकिरी वेषात. शिर्डीला आल्यावर त्यांनी सुरुवातीपासूनच वैद्यकी सुरू केली आणि अल्पावधीतच ते वैद्य म्हणून नावाजले जाऊ लागले.

**आरंभीं गांवीं वैद्यकी करीत। पाहूनि पाहूनि दवा देत। हातालाही यश बहुत। हकीम विख्यात जाहले।।**

– श्री साईसच्चरित, अध्याय ७, ओवी ४६

काही काळातच ते शिर्डीगावचे धन्वंतरी झाले. धन्वंतरी म्हणजे देवांचे वैद्य. त्यांनाही विष्णूचा अवतार म्हणून मानले जाते.

तर, असे हे शिर्डीगावचे धन्वंतरी बाबा, यांनी कित्येक दुर्धर रोग बरे केले. त्यांचे उपचारही अगदी जगावेगळे असत. ज्याचा उपयोग आजारपणात करू नये, अगदी तेच उपाय बाबा त्या आजारावर करीत असत. आश्चर्य म्हणजे त्याने रोग बरा होई.

**एकदां एका भक्ताचे डोळे। सुजूनि झाले लाल गोळे। रक्तबंबाळ दोनी बुबुळें। वैद्य न मिळे शिर्डीत।। भक्त बिचारे भाविक भोळे। बाबांसी दाखविते झाले डोळे। बिबे ठेंचूनि करविले गोळे। सत्त्वर ते वेळे बाबांनीं।। कोणी घालील सुरम्याच्या काड्या। कोणी गाईच्या दुधाच्या घड्या। कोणी शीतळ कापुराच्या वड्या। देईल पुड्या अंजनाच्या।। बाबांचा तो उपायचि वेगळा। स्वहस्तें उचलिला एकेक गोळा। चिणूनि भरला एकेक डोळा। फडका वाटोळा वेष्टिला।। उदयीक डोळ्यांची पट्टी सोडिली। वरी पाण्याची धार धरिली। सूज होती ती सर्व निवळली। बुबुळें जाहलीं निर्मळ।। डोळ्यासारिखा नाजूक भाग। नाहीं बिब्याची झाली आग। बिब्यानें दवडिला नेत्ररोग। ऐसे अनेक अनुभव।।**

– श्री साईसच्चरित, अध्याय ७, ओवी ४७–५२

ही झाली डोळ्यांची गोष्ट; याचबरोबर जुलाब, उलटी (वांती) यांच्यावरही बाबांचे उपचार अचंबित करणारे असत. बाबांचे परमभक्त बापूसाहेब बुट्टी यांना पोटात थंडी झाली होती. त्यामुळे सतत जुलाब व उलट्या होऊ लागल्या. त्याने बुट्टीसाहेब त्रस्त झाले. त्यांनी अनेक औषधोपचार केले; परंतु कशाचाही उपयोग झाला नाही. त्यांच्यात त्राणच उरला नाही. जेव्हा बाबांच्या कानावर ही गोष्ट गेली तेव्हा बाबांनी त्यांना आपल्याजवळ बोलावून घेतले आणि समोर बसविले. बापूसाहेबांची अवस्था बघून बाबांना त्यांची दया आली. बाबा म्हणाले,

**'खबरदार आतांपासूनि। मलविसर्जनीं जातां नये।। वांतीही राहिली पाहिजे ठिकाणीं।' तयांसन्मुख हालवूनि तर्जनी। पुनश्च पूर्ववत तयां अनुलक्षूनी। म्हटलें बाबांनीं तैसेंच।।**

– श्री साईसच्चरित, अध्याय १३, ओवी १०१–१०२

अशा या बाबांच्या शब्दांनी बापूसाहेबांच्या दोन्ही व्याधी दूर होऊन त्यांना आराम मिळाला.

एकदा गावात पटकीची साथ आली. बुट्टींनाही या साथीने घेरले आणि त्यांना उलट्या, जुलाब होऊ लागले. घशाला कोरड पडू लागली. पोटात मळमळू लागले. बाबांचे भक्त असलेले डॉ. पिल्ले यांनी सर्व उपाय केले; परंतु कुठल्याही उपायाला यश येईना. तेव्हा डॉ. पिल्ले बाबांपाशी गेले आणि त्यांनी बाबांना सर्व सांगून विचारले की, त्यांना 'कॉफी देऊ की पाणी?' तेव्हा बाबा म्हणाले.

**'खा दूध, बदाम, घाला। अक्रोडपिस्त्यांसह तयांला। प्यावयाला द्या तरण।। तेणें तयाची राहील तहान। होईल सत्त्वर व्याधिहरण।'**

– श्री साईसच्चरित, अध्याय १३, ओवी १०७–१०८

एकदा काका महाजनींना मोडशी (अजीर्ण) होऊन जुलाब होऊ लागले. तेव्हा बाबांनी त्यावर त्यांना भुईमूगाच्या शेंगा खावयास दिल्या आणि त्यांचे जुलाब बंद झाले. असे एक ना अनेक उपाय बाबा आपल्या भक्तांना करून त्यांच्या व्याधींचे हरण करीत.

परंतु, हे सारे उपाय बाबांच्या मुखातून निघाले, तरच ते इलाज म्हणून ठरत. पण, तेच जर आपण स्वत: मनाने करायला गेलो, तर ते अपाय ठरत; असेही अनुभव भक्तांना आले आहेत. आता हेच पाहा ना, सोनामुखीचा काढा कोणी उपाय म्हणून करतो का? नाही ना! पण, आपल्या बाबांच्या हातचा सोनामुखीचा काढा हा मूळव्याध बरा करणारा ठरला. त्याचे झाले असे की, माधवराव देशपांडे म्हणजे शामा मूळव्याधीने त्रस्त झाले होते. तेव्हा स्वत: श्री साईंनी आपल्या हाताने सोनामुखीचा काढा तयार करून

माधवरावांना दिला. हा काढा घेताच माधवरावांना आराम वाटला आणि हळुहळू मूळव्याधीतून ते बरे झाले. परंतु, नंतर पुन्हा एकदा या व्याधीने माधवरावांना ग्रासले, तेव्हा त्यांनी स्वत:च सोनामुखी आणून त्याचा काढा बनवला व घेतला, अन् घात झाला. आधी उपाय ठरलेला सोनामुखीचा काढा आताच्या खेपेला अपायकारक ठरला. त्यांची मूळव्याध अधिकच तीव्र झाली. त्यांना त्याचा फार त्रास झाला. शेवटी बाबांच्या कृपाशीर्वादाने व उदीने त्यांची या व्याधीतून मुक्तता झाली. सोनामुखीही तीच, त्याचे प्रमाणही तेच; फक्त आधी तो काढा बाबांनी स्वत:च्या हाताने बनवला, नंतरचा काढा माधवरावांनी बनवला, हाच काय तो फरक! म्हणजे सोनामुखी हे औषध नव्हे, तर बाबांचा हात, त्यांचा स्पर्श हेच मूळ औषध आहे, हे सिद्ध झाले.

सुरुवातीला बाबा अशी औषधे बनवून देत, तर काही मुखाने सांगून तशी घ्यायला लावीत.

अशा प्रकारे सुरुवातीला बाबा भक्तांना औषधोपचार करीत. मग पुढे पुढे केवळ उदीने ते भक्तांचे व्याधीहरण करीत. कुणाचा कर्णरोग, कुणाचा हाड्यावर्ण, कुणाचा हिवताप अशा कित्येक व्याधी बाबांच्या उदीने बऱ्या झाल्या आहेत. प्लेगसारखा महाभयंकर रोगही केवळ उदीने बरा झाला. आहे ना ही अतर्क्य बाब!

त्याचे असे झाले... माधवरावांच्या भावजयीला ताप येऊन तिच्या शरीरावर गाठी आल्या, तेव्हा साऊळ विहिरीपाशी राहणारे माधवरावांचे भाऊ बापाजी फार घाबरले आणि रात्रीच धावत माधवरावांपाशी येऊन त्यांना सारे सांगितले. तेव्हा माधवरावांनी द्वारकामाईत जाऊन बाबांची बापाजींच्या घरी जाण्यासाठी आज्ञा मागितली असता, बाबा म्हणाले,

**‘नको जाऊं अपरात्रीस। उदी दे तियेस पाठवूनि।। कशाच्या ग्रंथी कशाचा ताप। आपुला अल्ला मालिक बाप। बरें होईल आपोआप। होईल सुखरूप निर्धोर।। ...’**

– श्री साईसच्चरित, अध्याय ३४, ओवी १०६-१०७

बाबांच्या सांगण्याप्रमाणे माधवरावांनी केले. बापाजींनी आपल्या पत्नीस उदी पाण्यातून प्यायला दिली व सर्वांगाला चोळली. उदीचा प्रभाव एवढा विलक्षण होता की सकाळी माधवरावांची भावजय पूर्णपणे बरी झाली!

उदी तर बहुगुणी आहेच, याचबरोबर सर्वांत महत्त्वाचे म्हणजे श्रद्धा. बाबांवरची श्रद्धा मोलाची आहे. ही सर्वांत उपायकारक आहे. म्हणूनच तर या श्रद्धेने मातीसुद्धा मौल्यवान बनते व उपकारक ठरते. त्याचे असे झाले की, वांद्रे येथे राहणाऱ्या एका साईभक्ताची मुलगी ग्रंथीज्वराने आजारी पडली. ही मुलगी दुसऱ्या गावी राहत असल्याने वडिलांना जेव्हा निरोप कळला तेव्हा ते घाबरले, शिवाय त्यांच्यापाशी उदीही नव्हती. म्हणून त्यांनी आपल्याजवळच्या माणसाला नानासाहेब चांदोरकरांकडे पाठवून आपल्या मुलीसाठी बाबांना प्रार्थना करा आणि आपल्याजवळ उदी असल्यास ती प्रसाद म्हणून द्या, असा निरोप दिला. त्या गृहस्थाला नानासाहेब आपल्या पत्नीसह कल्याणला जाण्यास निघाले होते तेव्हा वाटेत म्हणजे ठाणे स्टेशनवर भेटले. त्या गृहस्थाने सारेकाही नानासाहेबांना निवेदन केले. त्यावेळी नानासाहेबांपाशीही उदी नव्हती. म्हणून त्यांनी लागलीच रस्त्यावरची माती उचलली आणि साईनाथांना तेथूनच गाऱ्हाणे घालून ती माती आपल्या पत्नीच्या कपाळाला लावली. ज्या क्षणी नानासाहेबांनी गाऱ्हाणे घालून आपल्या पत्नीच्या कपाळाला माती लावली त्या क्षणापासून त्या मुलीचा ग्रंथीज्वर उतरू लागला!

म्हणजे श्रद्धेची ताकद किती आहे, हे आपल्या लक्षात आले असेलच. याची प्रचीती आजही भक्तगण घेत आहेत.

बाबा, साईबाबा धन्वंतरी आहेत, हे कळले; पण खरंच, एवढ्यासाठीच बाबांनी अवतार घेतला होता का? खरंच, विचार करण्याची बाब आहे. साईबाबा लोकांना केवळ रोगमुक्त करण्यासाठी अवतरले नाहीत, तर लोकांना त्यांना भवमुक्तही करायचे होते. ते ऐहिक, तसेच पारमार्थिक धन्वंतरी आहेत. आपण मात्र त्यांच्याकडे केवळ ऐहिकातील आधी-व्याधी दूर व्हाव्यात म्हणून जात असतो. त्या दूर करताना बाबांना आपल्याकडून अपेक्षा असते ती आपण जीवनाचा खरा अर्थ समजून घेऊन मोक्षाप्रत जाण्यासाठी परमार्थमार्गाचा अवलंब करावा. बाबांनी सतत सांसारिक इच्छा पूर्ण कराव्यात म्हणून लोक बाबांकडे जात असतात, त्यावेळीसुद्धा व आतासुद्धा. एकदा तर, जेव्हा भिमाजी पाटील क्षयरोगाने आजारी होऊन बाबांपाशी आले, तेव्हा बाबा माधवराव देशपांडे म्हणजे शामाला थट्टेने म्हणाले होते,

**‘शामा हे चोर आणूनि किती। घालशी माझे अंगावरती। काय हे कृति बरी कां।।’**

– श्री साईसच्चरित, अध्याय १३, ओवी ६८

तसेच, एकदा नानासाहेबांना बाबा म्हणाले होते, ‘अरे, सारेच कावळे; एकही राजहंस नाही का?’

बाबा म्हणत –

*(पृष्ठ क्र. ३१वर)*






**शिर्डीवृत्त**

* जनसंपर्क प्रसिद्धी विभाग *

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

# श्री रामनवमी उत्सव २०१४

श्री साईबाबा संस्थानच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी सोमवार, दिनांक ७ एप्रिल २०१४ ते बुधवार, दिनांक ९ एप्रिल २०१४ या कालावधीत श्री रामनवमी उत्सव श्री साईबाबांच्या नामघोषात मंगलमय वातावरणात पार पडला.

श्री रामनवमी उत्सवाची सुरुवात १९११ मध्ये श्री साईबाबांच्या अनुमतीने करण्यात आली. तेव्हापासून प्रतिवर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहाच्या वातावरणात शिर्डी येथे साजरा केला जातो. या शतकपूर्ती उत्सवात भक्तांची दर्शनाची व्यवस्था सुखकर व्हावी व त्यांचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी मंदिर व परिसरात कापडी मंडप उभारण्यात आलेले होते. यामध्ये सुरक्षारक्षकांसह विद्युत व पाणीपुरवठा व्यवस्था करण्यात आलेली होती. याबरोबरच मुंबई व परिसरातून पालख्यांसोबत येणाऱ्या पदयात्रींची निवाऱ्याची सोय व्यवस्थित व्हावी म्हणून संस्थानच्या वतीने मुंबई ते शिर्डी महामार्गावर ठिकठिकाणी कापडी मंडप कनात-बिछायतीसह उभारण्यात आलेले होते. मंडपांमध्ये विद्युत व पाणीपुरवठ्याची सोय करण्यात आलेली होती. उत्सवकाळात तिन्ही दिवस साईसत्यव्रत (सत्यनारायण) आणि अभिषेक पूजा बंद ठेवण्यात आलेल्या होत्या.

उत्सवाच्या प्रथम दिवशी सोमवार, दिनांक ७ एप्रिल २०१४ रोजी सकाळी ४.३० वाजता काकड आरती झाली. काकड आरतीनंतर ५ वाजता श्री साईबाबांची तसबीर, श्री साईसच्चरित ग्रंथ व वीणा यांची शोभायात्रा साईसमाधिमंदिरातून द्वारकामाईपर्यंत काढण्यात आली. शोभायात्रेत संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे, उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे सहभागी झाले होते. शोभायात्रा द्वारकामाईत आल्यावर ५.१५ वाजता श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणाचा शुभारंभ झाला. यामध्ये संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे यांनी पहिल्या, तर उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे यांनी दुसऱ्या अध्यायाचे वाचन केले. सकाळी संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे यांच्या हस्ते श्रींची विधिवत पाद्यपूजा करण्यात आली.

दुपारी १२.३० वाजता माध्यान्ह आरती झाली. आरतीनंतर तीर्थप्रसादवाटपाचा कार्यक्रम झाला.

सायंकाळी ४ ते ६ या वेळेत ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांचा सुश्राव्य कीर्तनाचा कार्यक्रम समाधिमंदिरासमोरील मंचावर झाला.

सायंकाळी ६.३० वाजता धूपारती झाल्यानंतर रात्रौ ९.१५ वाजता श्रींच्या पालखीची गावातून शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रा परत आल्यानंतर रात्रौ १०.३० वाजता शेजारती झाली. उत्सवाच्या निमित्ताने साईनगर पटांगणावर आयोजित केलेल्या निमंत्रित कलाकारांच्या कार्यक्रमात, रात्रौ ७.३० वाजता कु. कविता व्यवहारे (पुणे) यांचा सप्तसूर परिवार निर्मित भक्तिगीते व भावगीते कार्यक्रम, तर रात्रौ ९.३० वाजता श्री. एम्. रामू व श्रीमती बिंदू माधवी (चेन्नई) यांचा भक्तिगीतांचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमांना श्रोत्यांनी भरभरून दाद

दिली. मंदिरपरिसरात द्वारकामाई मंडळाने साकारलेला श्री रामाची प्रतिमा असलेला विद्युत रोषणाईचा देखावा यावेळी साईभक्तांचे मुख्य आकर्षण ठरला होता. उत्सवातील प्रथम दिनाचे औचित्य साधून समाधिमंदिरात श्रींच्या मराठी भाषेतील आरत्यांचा श्री. सत्य खंडगराया व रव्हिंशॉ विद्यापीठ, कटकचे डीन डॉ. संजयकुमार सत्पती यांनी ओडिया भाषेत अनुवाद केलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. उत्सवाचा प्रथम दिवस असल्याने द्वारकामाई पारायणासाठी रात्रभर उघडी ठेवण्यात आली होती. संस्थान प्रशासनाने संभाव्य गर्दी लक्षात घेऊन केलेल्या नियोजनामुळे सर्व साईभक्तांना सुखकर व सुलभतेने बाबांचे दर्शन घेता आले. साईप्रसादालयामध्ये श्रीमती पद्मलता श्रीनिवास पी. (विजयवाडा), श्री. मुकेश भारद्वाज, मितेश क्लासेस (भोपाळ), श्री. दिनेशचंद्र सुरेशचंद्र वाडेगांवकर (औरंगाबाद) व श्री. टी. विजय (चेन्नई) या दानशूर साईभक्तांच्या देणगीतून साईभक्तांसाठी मोफत मिष्टान्न प्रसादभोजन देण्यात आले.

उत्सवाच्या मुख्य दिवशी, मंगळवार, दिनांक ८ एप्रिल २०१४ रोजी सकाळी ४.३० वाजता काकड आरती झाली. आरतीनंतर ५ वाजता अखंड पारायणाची समाप्ती झाली. श्री साईसच्चरित या पवित्र ग्रंथाची द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे सवाद्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. भालचंद्र देबडवार, सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे व उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे हे सहभागी झाले होते. दरवर्षीप्रमाणे द्वारकामाईतील गव्हाच्या पोत्याची, कावडीची व समाधिमंदिरात श्रींच्या पादुकांची संस्थानचे अध्यक्ष श्री. भालचंद्र देबडवार व सौ. सुवर्णा देबडवार यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. यावेळी सुमारे ४ हजाराहून अधिक साईभक्तांनी कावडीद्वारे आणलेल्या पाण्याने बाबांना जलाभिषेक करण्यात आला. १०.३० वाजता ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांचे श्री रामजन्मावर आधारित कीर्तन झाले.

दुपारी १२.३० वाजता माध्यान्ह आरती झाली. आरतीपूर्वी रासने व देशपांडे (निमोणकर) कुटुंबीय यांच्यावतीने नवीन निशाणाची विधिवत पूजा करून सायंकाळी ४ वाजता शोभायात्रा काढण्यात आली. त्यानंतर ५ वाजता श्रींच्या रथाची शिर्डी गावातून शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शोभायात्रा परत आल्यानंतर ६.३० वाजता धूपारती झाली.

उत्सवाच्या निमित्ताने साईनगर पटांगणावर आयोजित केलेल्या निमंत्रित कलाकारांच्या कार्यक्रमात रात्रौ ७.३० वाजता श्री. अजित कडकडे (मुंबई) यांचा साईभजनसंध्या, तर ९.३० वाजता श्री साईसत्संग फेस्टिव्हल (आसाम) यांचा नृत्य व साईप्रनामी हा कार्यक्रम झाला. तसेच, साईप्रसादालयाध्ये श्री. सुनिल अग्रवाल (मुंबई), श्रीमती सुशिलादेवी घनश्यामदास मासानी (गोंदिया), श्री. दिलीप मेहता (अहमदाबाद), श्री. श्रीनिवास शिरगुरकर (बंगळुरु), दुश्मनता कुमार एस्. (भुवनेश्वर), श्री. सचिनकुमार (डेहराडून) व सीता हरिहरन (अमेरिका) या दानशूर भक्तांच्या देणगीतून भक्तांना मोफत मिष्टान्न प्रसादभोजन देण्यात आले. श्रीमती रिम्पल लोहिया यांच्या देणगीतून समाधिमंदिर व परिसरात करण्यात आलेली फुलांची आकर्षक सजावट साईभक्तांचे लक्ष वेधून घेत होती. उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने समाधिमंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे होते.

उत्सवाच्या सांगता दिनी, बुधवार, दिनांक ९ एप्रिल २०१४ रोजी सकाळी ५.०५ वाजता श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी गुरुस्थान येथे संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे यांच्या हस्ते रुद्राभिषेक करण्यात आला, तर उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे व डॉ. सौ. शुभांगी शिंदे यांच्या हस्ते समाधिमंदिरात श्रींची पाद्यपूजा करण्यात आली.

दुपारी १२ वाजता ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर दहीहंडी कार्यक्रम होऊन माध्यान्ह आरती झाली. उत्सवाच्या निमित्ताने साईनगर पटांगणावर आयोजित केलेल्या निमंत्रित कलाकारांच्या कार्यक्रमात रात्रौ ७.३० वाजता श्रीमती कुसुमिता तिवारी व श्री. योगेश तिवारी (मुंबई) यांचा ऑर्केस्ट्रा, तर ९.३० वाजता श्री. जगदीश मारुती पाटील (ठाणे) यांचा साईभजनसंध्या हा कार्यक्रम झाला. तसेच, साईप्रसादालयामध्ये श्री. मनोहरलाल कारडा (कोल्हापूर) व श्री. पी. सूर्यनारायणन् मूर्ती (हैद्राबाद) या दानशूर साईभक्तांच्या देणगीतून भक्तांना मोफत मिष्टान्न प्रसादभोजन देण्यात आले.

या उत्सवातील तीन दिवसांत सुमारे २ लाख भाविकांनी साईप्रसादालयात मोफत प्रसादभोजनाचा लाभ घेतला, तर जवळजवळ २ लाख भाविकांना दर्शनरांगेतून

प्रसादरूपी मोफत लाडूपाकिटांचे वाटप करण्यात आले. तसेच, सकाळच्या प्रहरी अल्पोपहार म्हणून सुमारे ४२ हजार साईभक्तांनी नाष्टापाकिटांचा लाभ घेतला. बाबांच्या हयातीपासून सुरू झालेल्या या उत्सवास लाखो भाविकांनी पालख्यांसह शिर्डीत हजेरी लावून बाबांच्या समाधीच्या दर्शनाचा लाभ घेतला. उत्सवाच्या निमित्ताने साईनगर पटांगणावर आयोजित केलेल्या निमंत्रित कलाकारांच्या कार्यक्रमांना श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्रत्येक कार्यक्रमानंतर निमंत्रित कलाकारांचा व गेल्या ३६ वर्षांपासून समाधिमंदिर व परिसरात श्री साईबाबांच्या श्री रामनवमी व श्री पुण्यतिथी उत्सवात विद्युत रोषणाई करणाऱ्या व विविध देखावे उभारणाऱ्या श्री द्वारकामाई मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा संस्थानच्या वतीने आदरपूर्वक सत्कार करण्यात आला.

उत्सव यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. भालचंद्र देबडवार व सदस्य तथा जिल्हाधिकारी (अहमदनगर) श्री. अनिल कवडे, सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे, उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रशासकीय अधिकारी, सर्व विभागप्रमुख व कर्मचारीवृंदाने विशेष परिश्रम घेतले.



**सोमवार, दिनांक ३१.३.२०१४ : गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर साईसमाधिमंदिरावर संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे व सौ. सविता मोरे यांच्या हस्ते गुढीपूजन करण्यात आले. यावेळी संस्थानचे उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे उपस्थित होते.**

❍❍❍

*(पृष्ठ क्र. २८वरून)*

**'माझे सरकार न्या न्या वदे। मजलाच जो तो म्हणे दे दे।**
**कोणी न माझ्या बोलासीं लक्ष दे। एकही सुधें ऐकेना।।'**

– श्री साईसच्चरित, अध्याय ३२, ओवी १६१

याचा अर्थ 'श्री साईंचे सत्य चरित्र' यात दिला आहे, तो असा –

माझे सरकार ब्रह्मज्ञान घेऊन जा म्हणते, तर लोक माझ्याकडून केवळ ऐहिक सुखाची, म्हणजे धन-संपत्ती, पुत्रपौत्र, मान-सन्मान यांचीच मागणी करतात. ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यावर शाश्वत सुख मिळते हे त्यांना कळत नाही; आणि कळले, तर त्यासाठी स्वत: कष्ट करायची त्यांची तयारी नसते.

बघा, बाबांना आपली केवढी काळजी आहे ती; त्यांनी आपल्या भक्तांची ऐहिक प्रगती तर केलीच, त्याचबरोबर ते आपली परमार्थातील प्रगती करण्यासाठी किती उत्सुक आहेत, हे यावरून दिसते. कमी पडतो ते आपणच. आपण आपल्याच विश्वात, या मायेत गुरफटून राहतो. जीवनाचा खरा अर्थ समजून घेण्याचा आपण प्रयत्नच करीत नाही. आपण आपल्या या देहापुरताच विचार करतो. त्यानुसार उपचारासाठी, म्हणजे ऐहिक, शारीरिक उपचारासाठी धन्वंतरी साईंकडे जात असतो. परंतु, या देहात अनादि अनंत असा विश्वात्मक आत्मा आहे, त्याचा आपल्याला विसर पडतो. त्याची जेव्हा जाणीव होईल तेव्हाच आपल्याला खरे साईविश्व गवसेल आणि पारमार्थिक धन्वंतरी श्री साईंची आपल्याला खऱ्या अर्थाने ओळख होईल आणि तेव्हाच आपल्या अवघ्या जन्माचे सार्थक होईल.

**– सौ. मयूरी महेश कदम**
१३/७४, आग्रीपाडा बी. आय. टी. इमारती,
आर. बी. चांदोरकर मार्ग, मुंबई – ४०० ०११.
ई-मेल : saimayumahesh@gmail.com
भ्रमणध्वनी : (०)९८३३९९८७९४

❍❍❍



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) च्या वतीने १४ एप्रिल या अग्निप्रतिबंधक दिवसाचे औचित्य साधून संस्थान कर्मचाऱ्यांसाठी आगप्रतिबंधक उपाययोजना या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १४ एप्रिल ते २० एप्रिल हा अग्निप्रतिबंधक आठवडा म्हणून पाळण्यात येऊन, याअंतर्गत सदर उपक्रम राबवण्यात आला. संस्थानच्या संरक्षण विभागांतर्गत फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत संस्थानच्या विविध विभागांत वेगवेगळ्या प्रकारचे जे फायर एक्स्टिंग्वीशर सिलेंडर बसविण्यात आलेले आहेत, त्याबाबतची माहिती संस्थान कर्मचाऱ्यांना होण्याच्या दृष्टीने दिनांक १०, १२, १४ व १७ फेब्रुवारी, २०१४ रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तर, या शिबिरास उपस्थित न राहू शकलेल्या कर्मचाऱ्यांसाठी दुसऱ्या टप्प्यात दिनांक १६ व १९ एप्रिल, २०१४ रोजी दोन सत्रांत प्रशिक्षण देण्यात आले. याकामी शिर्डी नगरपंचायतचे फायर ॲण्ड सेफ्टी अधिकारी श्री. संभाजी कार्ले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. श्री. कार्ले यांनी हसत-खेळत व त्यांच्या विनोदी शैलीत या कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले, तर फायर ॲण्ड सेफ्टी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. या शिबिरामध्ये सुमारे ३ हजार कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले.

या शिबिराची योजना यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे, उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे, सर्व प्रशासकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संरक्षण अधिकारी श्री. एस्. आर. जाधव व संरक्षण विभागाचे अधिकारी, कर्मचारी व फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे श्री. प्रताप कोते आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. अभय दुनाखे यांनी केले.

OOO

# साईदर्शनार्थ



**सोमवार, दिनांक ३१.३.२०१४ :** चित्रपट अभिनेता श्री. नागार्जुन; सोबत संस्थानच्या त्रि-सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य व कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे




**मंगळवार, दिनांक १५.४.२०१४ :** अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष श्री. राहुल गांधी; सोबत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे, महाराष्ट्र राज्याचे कृषी व पणन मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील, अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अहमदनगर जिल्ह्याचे अध्यक्ष व संस्थानचे माजी अध्यक्ष श्री. जयंत ससाणे

## श्री रामनवमी उत्सव २०१४
### प्रारंभ दिन


काकड आरती


माध्यान्ह आरती


धूपारती


'श्री साईसच्चरित' पोथीच्या अखंड पारायणाचा शुभारंभ – संस्थानच्या त्रि–सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे; सोबत उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे...


शेजारती


'श्री साईसच्चरित' पोथी (संस्थानच्या त्रि–सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे), श्री साईंची तसबीर (उपकार्यकारी अधिकारी श्री. आप्पासाहेब शिंदे व मंदिरप्रमुख श्री. रामराव शेळके), वीणा (मंदिरपुजारी श्री. उपेंद्र पाठक) यांची शोभायात्रा; सोबत संस्थान कर्मचारी आणि भक्तगण...


संस्थानच्या त्रि–सदस्यीय व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा कार्यकारी अधिकारी श्री. अजय मोरे यांच्या हस्ते श्री साईबाबांची पाद्यपूजा...

## श्री रामनवमी उत्सव २०१४
### मुख्य दिन


काकड आरती


संस्थानच्या त्रि–सदस्यीय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा अहमदनगर जिल्ह्याचे प्रभारी प्रधान व जिल्हा सत्र न्यायाधीश श्री. भालचंद्र देबडवार व सौ. सुवर्णा देबडवार यांच्या हस्ते श्री साईबाबांची पाद्यपूजा...


माध्यान्ह आरती


धूपारती




संस्थानच्या त्रि–सदस्यीय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा अहमदनगर जिल्ह्याचे प्रभारी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. भालचंद्र देबडवार व सौ. सुवर्णा देबडवार यांच्या हस्ते समाधिमंदिरात गहूपोतीचे पूजन...


श्री रामजन्मसोहळा – ह.भ.प. श्री. विक्रम नांदेडकर...